विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०२१ |
| वर्ष | : | छप्पन्नावे |
| अंक | : | पहिला |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०२१**

**गणपत्रिका क्रमांक : २०५**

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : छप्पन्नावे अंक : पहिला फाल्गुन १९४२ / चैत्र १९४३ एप्रिल २०२१

## *संपादकीय*

### राष्ट्रगुरु रामदास : व्यक्तित्व व कार्य

माघ शुद्ध नवमी अर्थात २१ फेब्रुवारी २०२१ला समर्थ रामदासांनी लिहिलेल्या दासबोध या ग्रंथाची जयंती साजरी करण्यात आली. समर्थ रामदासांच्या एकूण कामाबद्दल आपण जाणतोच; मात्र त्यांच्या कार्याचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व तात्त्विक अर्थाने विश्लेषण व्हायला हवे. या परिप्रेक्षात समर्थांनी लिहिलेला दासबोध हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. पुढच्या पिढीने या ग्रंथाकडे डोळस दृष्टीने पाहून चारशे वर्षांपूर्वी लिहिलेला विचार आज देखील किती समयोचित आहे हे नक्की अनुभवण्यासारखे आहे.

रामदासांचा जन्म मराठवाड्यातील जांब ह्या लहानशा गावचा. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्याजीपंत, आईचे राणूबाई. राम आणि सूर्य ह्यांची उपासना त्यांच्या घरात होती. सूर्याजीपंत अनेक मुमुक्षूंना 'अनुग्रह' देत. रामदासांचे वडील बंधू गंगाधर 'श्रेष्ठ' आणि 'रामी रामदास' ह्या नावांनीही ओळखले जातात. रामदास आठ वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले आणि गंगाधर हे वडिलांचा संप्रदाय चालवू लागले.

वडिलांकडून आणि पुढे वडील बंधूंकडून आपल्याला मंत्रोपदेश मिळावा, म्हणून रामदासांनी प्रयत्न केला होता परंतु दोन्ही वेळी तो निष्फळ ठरला. रामदासांच्या एका अभंगावरून असे दिसते, की प्रत्यक्ष रामचंद्रांनीच स्वप्नात येऊन 'श्रीराम जयराम जयजयराम' हा त्रयोदशाक्षरी मंत्र त्यांना दिला.

आई आणि वडील बंधू ह्यांनी रामदासांचे लग्न, त्यांची इच्छा नसतानाही ठरविले पण मंगलाष्टकांमधले

(पृष्ठ क्र. २६ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु. (१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.). आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

३) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ''**सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट**'' या नावाने कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था असल्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) **सभासद क्रमांक** (सभासद असल्यास) (जो आपल्याकडे येणाऱ्या पाकीटावर ( ) मध्ये नमूद केलेला) जरूर नमूद करावा त्यामुळे सभासदांचे संपूर्ण नाव समजणे सोपे जाईल व मोबाईल/दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ''सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट'' नावाने खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN0009056** |
| **टीजेएसबी बँक** लि. TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा, ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम सभासद क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

स्टेट बँक ऑफ इंडिया त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा कार्यकारी विश्वस्त* यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

४) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

***श्रीमती रेखा प्रकाश दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१.** दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९९२०७९४७६९/९०८२९९०४३१. अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), काभे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| कालभैरवाष्टकम्। | ५ |
| गायत्री महाविज्ञान | ६ |
| संत रामदासस्वामी समर्थ प्रणीत ''दासबोधातील उत्तम योजकाची गुणवैशिष्ट्ये'' | ९ |
| श्रीमद्भागवत सप्ताह परंपरा - श्रीमद्भागवतपुराण | १३ |
| मानस पूजा | १८ |
| परमार्थाचे एक रसिक दर्शन | २२ |


**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि रु. ५
३) हरितालिका पूजा विधि रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) रु. १०
६) तुलसी विवाहविधि रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५
(या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी रु. ४०
१३) गंगालहरी रु. २५
१४) गणपत्यथर्वशीर्षातील व्याकरण रु. ३०
१५) सांख्यदर्शन रु. ३०
१६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) रु. १५

**३१ मार्च २०२१ पर्यंत**
**दीर्घकालीन सभासद (दी.का.) / ऐच्छिक देणगीदार**
**परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील**

श्री. श्रीरंग निवृत्ती केमकर, मुलुंड (पू.), मुंबई रु. २०००/-
सौ. स्नेहल नि. देशपांडे, पुणे रु. २०००/-
श्री. अमोल दिलीपराव कुलकर्णी, वणी, यवतमाळ रु. १०००/-
श्री. चंद्रशेखर अनंत बापट, पुणे रु. १०००/-
श्री. मुकुंद भीमराव कुलकर्णी, भांडूप (पू.), मुंबई रु. १०००/-

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ४४ वा

**धनिनोऽप्यदानविभवा गण्यन्ते –**

**धुरि महादरिद्राणाम्।** [४५४]

**दृन्ति न यतः पिपासम् अतः समुद्रो मरुरेव।।**

अत्यंत पैसेवाला सुद्धा दारिद्र्यांचा अग्रणी मानला जातो. जर त्याच्याजवळ दान करण्याची इच्छा नसेल तर 'उदधी (समुद्र) बडा कौन है जगत प्यासो जाय'।

**स्वभावसुन्दरं वस्तु न संस्कारम् अपेक्षते।**[४५५]
**मुक्ता रत्नस्यशाणाश्मघर्षणं न अपेक्षते।।**

एखादी वस्तू स्वभावतः च सुंदर असेल तर तिच्या वर सोपस्कार करावे लागत नाहीत.

**'सुलोचना जीर्णपटाऽपि शोभते।'**

**सोत्साहानां नास्त्यसाध्यं नराणाम्।**[४५६]

उत्साही माणसाला काहीच असाध्य नाही. काष्ठादग्निर्जायते मथ्यमानात्–लाकडावर लाकूड घासले की अग्नी निर्माण होतो.

भूमिस्तोयं मथ्यमाना ददाति। – जमीन खणली तर पाणी लागते 'सोत्साहानां...।

**मार्गारब्धाः सर्वयत्नाः फलन्ति।।**

**सतां सङ्गो हि भेषजम्।**[४५७]

सज्जनांशी मैत्री हे औषधच आहे.

**सङ्गः सर्वात्मना त्याज्यः**

**स चेत् व्यक्तुं न शक्यते।**

**स सद्भिः सह कर्तव्यः**

**सतां सङ्गो ...।।**

सर्वे गुणाः कञ्चनमाश्रयन्ते।[४५८]

मनुष्य श्रीमंत असला म्हणजे लोक त्याला नसलेले गुण देखील चिकटवितात.

यथा विहङ्गाः तरुमाश्रयन्ति– पक्षी झाडाचा आश्रय घेतात.

नद्यो यथा सागरमाश्रयन्ति–नद्या समुद्राचा ...

यथा तरुण्या पतिमाश्रयन्ति–स्त्रीया पतीचा ...

सर्वे गुणाः कञ्चनम! (सोन्याचा–श्रीमंतीचा)

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड – ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाईल : ९६३७२४८१४७/
९४२००५९५७४

●●●

## कालभैरवाष्टकम्।

दि. दा. औटी

**(श्लोक ७ वा)**

**अट्टहासभिन्नपद्मजाण्डकोशसंततिं**
**दृष्टिपात्तनष्टपापजालमुग्रशासनम्।**
काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे।।७।।

पाद १ ला :

अट्टहास - प्रचंड हास्य. अट्टहासात्- भिन्ना अट्टहासभिन्ना पं. तत्पु. तस्मात्।

पद्मज-ब्रह्मदेव पद्म - कमळ पद्मात् जातः

पद्मजः पं. तत्पु.। पद्ममेव अण्डकोशसंतति यस्य सः बहु.। तम्।

पाद २ रा :

दृष्टिपातात् एव पापजालं नश्यति

यथोक्त उग्रशासनं यस्य सः। बहु.। तम्।

पाद ३ रा :

अष्टसिद्धयः यच्छति इति अष्टसिद्धिदायकः उप. तत्पु.। तम्।

कपालमालिकाधरम् - कपालानां मालिका ष. तत्पु. सा धरति इति उप। तम्।

पाद ४ था :

ध्रुवपद - यापूर्वीच विवेचन लिहिले आहे.

टीप : श्लोक ७ पाद १ ला अत्यंत दुर्बोध आहे व त्याची संगती लावणे कठीण गेले आहे. यशाशक्ती प्रयत्न केला आहे. सूज्ञांनी सुधारणा करून घ्यावी ही विनंती.

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०१
मोबाईल : ९६३७२४८१४७/
९४२००५९५७४

•••

सर्व सभासदांना नम्र सूचना आहे की आपण आपली वर्गणी अथवा देणगी पाठवताना प्रथम आपला सभासद क्रमांक (जो आपल्याकडे येणाऱ्या पाकीटावर () मध्ये नमूद केलेला) जरूर नमूद करावा त्यामुळे सभासदांचे संपूर्ण नाव समजणे सोपे जाईल.

(लेखाचा उर्वरित भाग मागील अंकापासून पुढे ...)

जर सामुदायिकरित्या अनेक जणांनी एका स्वरात गायत्रीचा जप केला तर गायत्रीच्या तेज, प्रकाश अशा शक्तीचे झोतच्या झोत सर्वांच्या शरीरात प्रवेश करीत आहे असं त्यांना दिव्यदृष्टीने (Clairvoyance) पहाता आलं. ती प्रस्तावना सर्वांनी अभ्यासपूर्वक वाचावी. आणखी एक महत्वाची गोष्ट त्यांनी सांगितली आहे. आपल्या भारतीय परंपरेत असे म्हटले आहे की सूर्यास्त झाल्यावर गायत्री जप करू नये. कारण सूर्य दृष्टीआड झाल्यावर त्याच्यामार्फत सूर्यकिरण कसे प्राप्त होणार? त्यावर लेडबीटर यांचे प्रतिपादन असे आहे की सूर्यकिरण (गायत्रीपासून मिळालेले) अंधार पडल्यानंतर देखील जप केल्यास सूर्याचा किरण (म्हणजेच गायत्रीचा किरण) पृथ्वीचे घन आणि जडतत्व भेदून जप करणाऱ्याच्या शरीरात प्रवेश करून आवश्यक त्या ग्रंथींची उत्तेजना देण्याची शक्ती गायत्रीच्या जपात आहे. हे ही त्यांनी दिव्यदृष्टीने (Clairvoyance) अनुभवले व ते लिहून ठेवले आहे.

**गायत्री जपाचे लाभ :**

दुर्गुणांचे प्रमाण कमी होऊ लागते. काम, क्रोध, मोह, मद, मत्सर, स्वार्थ, आळस, व्यसन, व्यभिचार, छळकपट, पाखंड, चिंता, भय, शोक, कंजूषपणा यासारखे स्वभावदोष कमी कमी होऊ लागतात आणि संयम, नियम, त्याग, समता, निरहंकारिता, साधेपणा, निष्कपटीपणा, सत्यनिष्ठा, आस्तिकता यासारख्या दैवी गुणसंपदा वाढत जातात. गायत्री साधनेने, लक्ष्मी, ऐश्वर्य व यशः प्राप्ती होते. प्राचीन काळी वसिष्ठ, याज्ञवल्क्य, अत्रि, विश्वमित्र, व्यास, शुकदेव, दधीची, वाल्मीकी, च्यवन, शंख, लोमश, मैत्रेय, जाबालि, उद्दालक, वैशंपायन, दुर्वास, परशुराम, पुलस्त्य, दत्तात्रेय, अगस्ति, सनत्कुमार, कण्व, शौनक इतयादि ऋषी–महर्षींनी गायत्रीचाच आधार घेऊन मोठमोठ्या योगसाधना व तपःश्चर्या केल्या आणि आपल्या जीवनाचे सार्थक केले होते आणि अर्वाचीन काळात सुद्धा समर्थ रामदास, नरसी मेहता, संत ज्ञानेश्वर, स्वामी रामानंद, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, तुलसीदास, रामानुजाचार्य, माधवाचार्य, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, रामतीर्थ, अरविंद घोष, महर्षि रमण, गौरांग प्रभू. स्वामी दयानंद इत्यादी महात्म्यांनी आपला आत्मविकास व समाजाचा विकास करण्याचा प्रयत्न गायत्री शक्तिच्याच आधारावर केला होता.

गायत्रीचा आणखी एक विशेष म्हणजे ही सकल संकट निवारिणी शक्ती आहे. आणि त्याचमुळे ''गायन्तं त्रायते यस्मात् गायत्री त्वं ततः स्मृता'' असा उल्लेख जप सुरु करण्यापूर्वी केला जातो.

**गायत्रीचा प्रभाव :**

गायत्रीचा जप करणारी व्यक्ती ही तेजस्वी बनते. इतरांवर त्याचा प्रभाव पडतो. बरेच लोक त्याची अवती भोवती फिरतात आणि आपल्याला अशी स्थिती लाभू शकेल का अशी इच्छा मनात बाळगू लागतात. कोणत्याही पापापासून मुक्ती किंवा निवृत्ती ही फक्त गायत्रीच करू शकते. या ठिकाणी महर्षी वाल्मिकींचा उल्लेख केल्यावाचून राहवत नाही. वाल्या कोळ्याने असंख्य वाटसरूंना ठार मारुन त्यांच्याकडील धनसंपत्तीची अफाट लूट केली होती. परंतु नारदमुनी वाल्याला भेटल्यानंतर त्याला उपरती झाली आणि नारदमुनींनी त्याला सांगितलेला रामनामाचा जप करीत तो पापमुक्त झाला. एवढ्याने भागले नाही. त्याने गायत्रीची उपासना आणि साधना देखील केली व तो महर्षी झाला. वाल्याचा वाल्मीकी ऋषी बनला आणि त्याला सर्व ज्ञानप्राप्ती झाली आणि त्याचमुळे त्याला रामायण हा जगप्रसिद्ध आणि अत्यंत प्रभावी संस्कृत ग्रंथ लिहिता आला. रामायणावर सुरुवातीच्या सर्गापासून (अध्यायापासून) शेवटच्या सर्गापर्यंत गायत्रीची छाया होती आणि अजूनही आहे हे बऱ्याच जणांना माहित नसावे. रामायणात २४ सर्ग आहेत आणि गायत्री मंत्रामध्ये पण २४ अक्षरे आहेत. प्रत्येक सर्गाच्या सुरुवातीच्या प्रथम श्लोकाचे पहिले अक्षर हे गायत्री मंत्रातील पहिले अक्षर आहे आणि त्याचप्रमाणे सर्व सर्गांच्या पहिल्या श्लोकाचे प्रथम अक्षर हे गायत्री मंत्रामधील दुसरे आणि क्रमाने तिसरे असे करत २४ सर्गांत गायत्री मंत्र सामावला आहे. गायत्री मंत्राची २४ अक्षरे यांची वाल्मीकींनी रामायणात गुंफण केली आहे. हे केवढे प्रभावी व आश्चर्यजनक आहे.

**गायत्री जपाची पद्धत :**

सकाळी स्नान करून देवापुढे बसून आणि घरात देव नसल्यास पूर्व दिशेकडे तोंड करून कापडी किंवा लोकरीच्या आसनावर बसून नंतर विष्णूची २४ नावे उच्चारावीत. ती खालीलप्रमाणे –

१) ॐ केशवाय नमः २) ॐ नारायणाय नमः ३) ॐ माधवाय नमः ४) ॐ गोविंदाय नमः ५) ॐ विष्णवे नमः ६) ॐ मधुसुदनाय नमः ७) ॐ त्रिविक्रमाय नमः ८) ॐ वामनाय नमः ९) व श्रीधराय नमः १०) ॐ हृषिकेशाय नमः ११) ॐ पद्मनाभाय नमः १२) ॐ दामोदराय नमः १३) ॐ संकर्षणाय नमः १४) ॐ वासुदेवाय नमः १५) ॐ प्रद्युम्नाय नमः १६) ॐ अनिरुद्धाय नमः १७) ॐ पुरुषोत्तमाय नमः १८) ॐ अधोक्षजाय नमः १९) ॐ नारसिंहाय नमः २०) ॐ अच्युताय नमः २१) ॐ जनार्दनाय नमः २२) ॐ उपेन्द्राय नमः २३) ॐ हरये नमः २४) ॐ श्रीकृष्णाय नमः

यानंतर पुढील श्लोक म्हणावा.

**यो देवः सविताऽ स्माकं धियो धर्मादि गोचरे।**
**प्रेरयेत् तस्य तद् भर्गस्तत् वरेण्यं उपास्महे।।**

यानंतर गायत्रीचा ध्यान मंत्र खालीलप्रमाणे म्हणावा.

**गायत्रीचा सार्वकालिक ध्यान मंत्र :**

**मुक्ता विद्रुम हेम नील धवलच्छयैर्मुखै स्त्र्यक्षर्णे।**

**युक्तामिंदुकलानिबद्धमुकुटां तत्त्वार्थ वर्णात्मिकाम।**

**गायत्रीवरदाभयांकुशकुशां शुभ्रं कपालं गुणं।**

**शंखं चक्रमथारविंद युगुलं हस्तैर्वहन्तीम् भजे।।**

**आगच्छ वरदे देवी, जपे मे संन्निधौ भव**

**गायन्तं त्रायते यस्मात् गायत्री त्वं ततः स्मृता**

**दशगायत्री जपमहं करिष्ये।**

**ॐ भूर्भुवस्वः ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात् ॐ**

**अर्थ :** त्या देवरुपी सवित्याचे अत्यंत श्रेष्ठ आणि तेजस्वी रुपाचे आम्ही ध्यान करतो कारण तो आमचा बुद्धीस सत्प्रेरणा देतो.

१० वेळा अगर १०८ वेळा जप झाल्यानंतर एक ओळीचा एक मंत्र आहे, तो म्हटल्याखेरीज जपाची पूर्तता होत नाही. तो असा

**ॐ आपो ज्योति रसोऽ मृतं ब्रह्म भूर्भुवस्वरोम्।।**

या मंत्रास गायत्री-शिरस् असे म्हणतात.

गायत्री मंत्राला ॐ आणि भूर्भुवस्वः अशा व्याहतींचा उच्चार मंत्रात केला आहे.

कोणत्या वाणीत जप करावा? वाणी ४ प्रकारच्या आहेत.

१) वैखरी २) मध्यमा ३) पश्यन्ती ४) परा

वैखरी वाणीत जप करणे म्हणजे इतरास ऐकू जाईल अशा स्वरात जप करणे. नवख्या जापकाने किमान १ वर्ष तरी वैखरी वाणीत जप करावा. मध्यमा वाणीत जप करावयाचा असेल तर फक्त जवळच्या व्यक्तिलाच ऐकू जाईल अशा हळू स्वरात जप करावा. पश्यन्ती वाणीत जप मनातल्या मनात करावा. त्यालाच मानसिक जप असेही म्हणतात. परा वाणीत जप करावयाचा नसतो. तो मनातल्या मनात ऐकू येतो. अशी अवस्था अत्यंत दुर्मीळ आहे. गायत्री जप यशस्वी होण्यास, विश्वास, श्रद्धा व सातत्य यांची नितान्त आवश्यकता आहे.

**स्त्रियांना गायत्री उपासनेचा अधिकार :**

स्त्रियांना वेदाध्ययनाचा अधिकार आहेच आणि गायत्री मंत्र हा वेदातच असल्यामुळे गायत्री उपासनेचा अधिकार त्यांना आहेच. वेदाध्ययन करणाऱ्या ऋषीपत्नी व ऋषीकन्या यांची यादी पुढीलप्रमाणे आहे. घोषा, गोधा, विश्ववारा, अपाला, ब्रह्मजाया, अदिती, इन्द्राणी, इन्द्रमाता, सरमा, सेमशा, उर्वशी, लोपामुद्रा, नद्या, यमी, शाश्वती, श्री, लक्ष्मी, सर्पराजी, वाक्, श्रद्धा, मेधा, दक्षिणा या सर्व ऋषीकुलांतील स्त्रिया यज्ञविद्येत व ब्रह्मविद्येत पारंगत होत्या. कित्येक स्त्रिया तर याबाबत आपले पती व पिता यांनासुद्धा मार्गदर्शन करीत असत.

**गायत्रीवरील साहित्य :**

गायत्री महात्म्य, गायत्री-गीता, गायत्री स्मृती, गायत्री-उपनिषद्, गायत्री रामायण, गायत्री ह्दय, गायत्री पंजर, गायत्री संहिता,

(पृष्ठ २५ वर)

## संत रामदासस्वामी समर्थ प्रणीत ''दासबोधातील उत्तम योजकाची गुणवैशिष्ट्ये''

वसंत गोडबोले

संस्कृत भाषेत अनेक मर्मग्राही सुंदर विचारांची सुभाषिते आहेत ज्यांचा अर्थ वाचला की कळते त्या सुभाषितकारांनी जीवनाचा किती सखोल सर्वांगीण अभ्यास समर्पकपणे केला होता. संत श्रीरामदासस्वामींचा दासबोध हा ग्रंथराज अभ्यासला असता त्यातील अनेक उपदेश विविध संस्कृत सुभाषितांची आठवण / स्मरण करुन देतात. व्यवस्थापन शास्त्रचा उगमही या दासबोध ग्रंथांत आहे. असेच एक संस्कृत सुभाषित वाचण्यात आले ज्यावर त्या अनुषंगाने श्रीसमर्थ रामदासस्वामींनी व्यवस्थापक कसा असावा याचे विविध दृष्टीकोनातून विवेचन केले आहे. आजचा काळ त्यावेळच्या काळापेक्षा कितीतरी बदलला असल्याने त्या विवेचनातील काही भाग अप्रस्तुत होतो पण शाश्वत, चिरस्थायी तत्वे अबाधितच राहतात. ते संस्कृत सुभाषित असे :-

''अमंत्रः अक्षरं नास्ति ।
नास्ति मूलं अनौषधम् ।
अयोग्यः पुरुषः नास्ति ।
योजकस्तत्र दुर्लभः।।

याचा अर्थ :- असे एकही अक्षर नाही की ज्याचा मंत्र करण्यास वा मंत्रात उपयोग होत नाही. असे एकही वनस्पती मूळ/मूळी नाही जिच्यात औषधीगुण नाहीत, असा एकही पुरुष/व्यक्ति नाही जो सर्वथैव अपात्र/अयोग्य/निरुपयोगी आहे, दुर्लभ आहे तो योजकच (जो कोणाचा, केव्हा, कोठे, कशासाठी, कसा, किती प्रमाणात, किती काळ उपयोग होईल हे जाणणारा व त्याप्रमाणे योजना करणारा असतो). हा अर्थ अगदी सहज सोपा त्यामुळे त्यावर भाष्य अधिक न करता त्यात महत्वाचा गाभा ''योजक'' यावर दासबोधातील व्यवस्थापन या संदर्भात श्री समर्थांनी जे विवेचन केले आहे योजकाचे गुण/पात्रता याविषयी ते हल्लीच्या ''व्यवस्थापन'' प्रणालीत उद्योजक/निदेशक/प्रमुख यांच्या गुणवता निष्कर्षाप्रमाणेच आहे एवढेच नव्हे तर काही बाबतीत त्यापेक्षा उच्च/सरस आहे हे कळावे म्हणून हा लेख लिहिला आहे. देश असो, पक्ष असो, उद्योग/व्यवसाय असो कोणताही, संरक्षण दल असो कोणत्याही क्षेत्रात अत्यंत कुशल प्रभावी नेतृत्वच लागते प्रगतीसाठी. समाजाचे विकासासाठीही असेच नेतृत्व अत्यावश्यक असते.

श्रीरामदास स्वामी समर्थ यांनी त्यांच्या भारतभ्रमणात समाजाची, धर्माची, लोकांची परकीय राजयंत्रणेमुळे झालेली परवड, दयनीय अवस्था, अगतिकता, मानसिक दौर्बल्य व पिळवणूक इ. सर्व पाहिले व अनुभवले होते. १२ वर्षे स्वाध्याय व १२ वर्षे भारतभ्रमणातून केलेला समाजअभ्यास व निरीक्षणांनी समाज सत्त्व विसरलेला, विघटीत/विस्कळीत व असुरक्षित असून त्यास एकत्र करुन प्रगतीकडे

नेणारा नेता/योजक हवा आहे. याचे उदाहरण हल्लीच्या काळात टाटा, बिर्ला, रिलायन्स इ. जे प्रमुख उद्योग प्रचण्ड एच.एम.टी, एच.ए.एल. इ. बंद झाले ते अयोग्य नाकर्त्या संचालकांमुळेच हे उघड आहे. श्रीरामदास स्वामीसमर्थ यासाठीच नेता/प्रवर्तक/संचालक यांचे अंगी कोणते गुण असावेत त्याबद्दल उत्तमपुरुष लक्षण, विवेक लक्षण, चातुर्य लक्षण, सद्विधा निरुपण या दशकांतून सांगतात. त्याबद्दल आजचे व्यवस्थापनात ही गुणवत्ता संघटक/प्रवर्तक यात कशी असावी याबद्दलचे निष्कर्ष/आवश्यक मानदंड काय आहेत ते संक्षेपात बघू.

उत्तम व्यवस्थापक ही ज्ञानी, धोरणी, द्रष्टा, मेहनती, अभ्यासू, मनमिळावू, परिस्थिती आकलन करणारा, साधन सामुग्री अर्थ (पैसा) यांची सांगड घालणारा प्रगतीशील व मनुष्यबळ सुयोग्य रित्या वापरणारा, सावध असणारा. परिस्थितीप्रमाणे सुयोग्य बदल करुन धंदा/व्यवसाय सावरणारा, सुयोग्य आर्थिक नियोजन करणारा. सरकारी धोरणे व कायदे, तसेच बदलते तंत्रज्ञान व त्यानुरुप प्रगत साधने इ. ची अंमलबजावणी करणारा असावा लागतो. स्थानिक, राज्याची देशाची पातळी यावरच नव्हे तर आंतरदेशीय पातळीवर प्रगत होवून स्थान मिळवण्याची दृष्टी असलेला योजक नेहमीच यशस्वी होतो. तसेच तो विश्वासू (RELIABLE) असावा लागतो. ही व अन्य गुणवक्ता याप्रमाणे व्यवस्थापकात हल्ली नसतील तर तो व्यवसाय बंद पडण्यास/अधोगतीस नेण्यास कारणीभूत होतो. हे व्यवस्थापन नेतृत्व/नेता त्याच्या वैयक्तिक्र विचारसरणीशी निगडीत असते पण ती विचारसरणी जर एककल्ली, हुकुमशाही, अट्टाहासी अविवेकी असेल तर समाज, राज्य, देश, व्यवसाय अधोगतीस जातात.

अर्थात यात एक अत्यंत महत्वाचा गुण म्हणजे हा नेता/व्यवस्थापक/संचालक नुसता कार्यक्षम EFFICIENT असून चालत नाही तर तो प्रभावी असावा (EFFECTIVE) लागतो नाहीतर सगळे व्यर्थ. मोठमोठे नेते, राजकारणी, सैन्यप्रमुख, उद्योगपती तेच झाले यशस्वी जे नुसते (EFFECTIVE) नव्हते तर EFFECTIVE प्रभावी होते व हेच सत्य आहे या दोन्ही गोष्टींची नितांत आवश्यकता असते. १) DETERMINATION (कृतनिश्चय) २) DEVOTION (श्रद्धा/विश्वास), ३) DEDICATION (समर्पण) ४) DISCIPLINE (शिस्त) या चार गोष्टी एकसमयावच्छेदेकरुन तेथे यश (DEITY) (परमार्थात ईश्वर म्हणा) हे निर्चित असतेच.

हेच सर्व दासबोधात वरील चार दशकात आहे, त्याचा विचार करु या म्हणजे श्रीसमर्थ रामदासांचे आद्य व्यवस्थापन गुरु हे संबोधन किती सार्थ ते कळेल. समर्थ रामदास शिष्यांना उत्तम ज्ञान देवून ध्येयापर्यंत जाण्यास मदत जरी करीत तरी ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी समाजापासून अलिप्त राहणे वैराग्यवृत्तीने हे मान्य नव्हते त्यांना; तर त्या ज्ञानाप्राप्तलोकांनी आपल्या घडणजडणीवर समाजाचेही योगदान/वाटा आहे हे जाणून समाजातील अन्य जनांचा उद्धार/विकास करण्याचे आपणावर असलेले

समाजऋण फेडावयाचे या जाणीवेने लोकांतात राहून कार्य करावे ही समर्थ रामदासांची धारणा होती. असे वाचण्यात आले आहे की स्वतः रामदास स्वामी हिमालयात देहत्याग करणार होते तेव्हा प्रत्यक्ष प्रभू श्रीरामचंद्रांनी ''तुमची तनू (शरीर) आमची आहे'' असे सांगून त्या देहत्यागापासून परावृत्त केले व ''तुमचा जन्म जगदोद्धारासाठी आहे'' असे सांगून लोकांतात पाठविले.

दासबोधात दशक १२ समास १० हा व दशक १८ समास ६ हे दोन विभाग वा दोन दशकातील समास ''उत्तमपुरुष'' निरुपणावर आहेत- या लक्षणाचा/गुणांचा विचार करु. सर्व सजीवांमध्ये केवळ बुद्धीच्या असिमित देणगीने केवळ मनुष्यजातच ज्ञान/आत्मज्ञान पाप्त करु शकते; तरी काही मोजकीचे माणसे आत्मज्ञान प्राप्त करु शकतात. अज्ञानी माणसांचे प्रमाणे त्या तुलनेत प्रचण्ड आहे व म्हणूनच ज्ञानी माणसांनी ह्यांच्यावरची ही सामाजिक, जबाबदारी जाणून अज्ञानी माणसांना ज्ञानी करण्याचा वसा घ्यावा हा श्रीसमर्थाचा आग्रह आहे, नव्हे आज्ञाच आहे. म्हणून नेतृत्व/व्यवस्थापकत्व करणारा नेता ''आत्मज्ञानी'' हवा हे पहिले लक्षण. त्यासाठी द. १२ स. १० ओवी १ →''तैसे ज्ञाने तृप्त व्हावे । तेचि ज्ञान जगास सांगावे । तरतेन बुडोनेदावे । बुडतयासी।।.'' ज्योतीने ज्योत पेटवावी व अंधार दूर करावा हे तत्त्व येथे लागू होते. उत्तम नेता/शिक्षक सदा दुसऱ्यास आपले ज्ञान देवून त्यास आपल्याप्रश्चात कार्य संभाळण्यास/वृद्धींगत करण्यास सक्षम करतात कारण नाहीतर ONEMAN SHOW प्रमाणे संस्था/कारखाने/पक्ष इ.इ. लय पावतात हे त्यांना माहित असते.

म्हणून आत्मज्ञानी योजकामध्ये दुसरा गुण हवा तो उत्तम पुरुष हा सदा विद्यार्थी असावा. आपणाजवळ असलेले ज्ञान परिपूर्ण आहे असा कूपमंडूकवृत्तीचा नसावा कारण ज्ञान अफाट, अथांग आहे. जर कोणी योजक या कूपमंडूकवृत्तीने आत्मसंतुष्टता मानत असेल तर ती आत्मवंचना ठरेल व ती अधोगतीस / विनाशास पात्र होईल. ही ज्ञानप्राप्तीगुणाची ओवी (१२द. स.१० ओ ३) स्पष्ट करते ''उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे। वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ।।'' श्रीसमर्थ रामदास यांनी स्वतः वागून मग तसा उपदेश शिष्यांना केला; अनुभवाविण बोलणे शब्दच्छल असतो. स्वतः योजकाने उत्तम गुण आत्मसात करावे, नवीन ज्ञान मिळवावे, नीतिनियम, सदाचार, गुणग्राहकता अंगी आणावी. दंभाचार, अभिमान, क्रोध, आत्मप्रतिष्ठा व्यर्ज करावी/त्यागावी. शबरीप्रमाणे प्रत्येक गोष्ट / ज्ञान आत्मसात करुन अनुभवावे व मगच इतरास सांगावे तरच लोकांना प्रचिती येईल व लोक तुमचे अनुयायी होतील. हे गुण नसल्यास तुमचा प्रभाव EFFECT नष्ट होईल व तुमचे कार्यही ठप्प/कालबाह्य होईल. या यंत्रयुगात प्रतिदिन नवीन क्रांतीकारी शोध लागत आहेत, नवी उपकरणे, तंत्रज्ञान, प्रगत अस्त्रे, शस्त्रे, औषधे. इ. येत आहेत. ते प्रगत तंत्रज्ञान आत्मसात न केल्यास कालबाह्य तंत्रज्ञानावर विसंबित

कारखाने, सैन्यदले, देशप्रगती नष्ट होणारच. आज कोणी दुर्गनीति युद्धात वापरील वा तलवार बाण वापरील तर त्याचा दारुण पराभव होईल. आपणही आज प्रगत शस्त्रे, नौका, शेतीज्ञान, औषधे इतर प्रगत राष्ट्रांकडून घेत आहोत हे लक्षात ठेवावे नाहीतर नुकसान होईल?

बरेच कारखाने सरकारी उद्योग या गुणअभावीच बंद झालेत. तेव्हा हा विचार त्याकाळी समर्थ रामदासांनी सांगितला यावरुन त्याचे द्रष्टेपण लक्षात येईल. योजक सतत विद्यार्थी हवा ते याचसाठी. प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. अल्बर्ट आइनस्टाइनचे विचारही असेच होते. एक विचार या सदैव ज्ञानर्जनासंबंधीचा मुद्दाम येथे देत आहे. "A hundred times everyday, I remind myself that my inner & outer life depended on the Labours of other men, living and dead, and that I must exert myself in order to give in the same measures as I have received and am still receiving" - ALBERT EINSTEIN".

काळानुरुप बदल करण्याचा हा गुण योजकात असणे म्हणजेच दूरदृष्टी.

उद्योग, कारखाना, सैन्यदल इ. अनेक ठिकाणी माणसे कार्यरत असतात. योजकाने MAN MANAGEMENT करतांना हुकूमशाही कृती न ठेवता त्या सेवक / कर्मचाऱ्यांमध्ये गुणवत्ता तसेच विश्वासार्हता निर्माण केली पाहिजे. त्यांचेवर अन्याय/ दडपशाही न करता त्यांच्या चुका क्षमा करून व परत होऊ नयेत म्हणून चुका का झाल्या याचा कार्यकारणभाव समजावून सांगावा. त्यांच्या हिताकडे लक्ष द्यावे. त्यांनाही निरंतर शिक्षण प्रणालीद्वारे प्रगत ठेवावे (CONTINUOUS EDUCATION PROGRAMME) त्यांच्याकडून येणाऱ्या उपयुक्तसूचनांचे स्वागत करुन सन्मानित करावे व समयकालबद्ध मेळावा (MEETING) घेऊन प्रगती, नवीन योजना इ. चा विचारविनिमय करावा, त्यासाठी योजकामध्ये अखंड प्रयत्नवाद व अथक परिश्रमवृत्ती हवी. ''लोकांसाठी श्रमावे'' हा गुण समर्थ रामदास द. १२ स. १० ओवी ५ मध्ये सांगतात ''शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावे । उणे पडो नेदावे । कोणियेकाचे ।।'' तसेच पुढे ओवी ७, ८ व ११ मध्ये ते वरील ज्ञान / उपदेश विशद करतात त्या ओव्या अश्या –

दुसऱ्याच्या दुःखे दुःखवावे । परसंतोषे सुखी व्हावे
प्राणिमात्रांस मेळवून घ्यावे । बऱ्या शब्दे ।। १२.१०.७
बहुतांचे अन्याये क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ।
आपल्यापरीस व्हावे । पारखे जन ।। १२.१०.८
आलस्य अवघा दवडावा । येत्न उदंडचि करावा ।
शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ।। १२.१०.११

''पेरले तसे उगवते'' हा बहुमोल इशारा त्यांनी याच समासात देवून योजकास सावध

(पृष्ठ १७ वर)

## श्रीमद्भागवत सप्ताह परंपरा - श्रीमद्भागवतपुराण

**दिशा प्रसादे**

मागील लेखात पुराण वाङ्मयाबद्दल परिचय दिला होता. प्रस्तुत लेखात या पुराणांमधील भागवतपुराणाविषयी माहिती दिली आहे. भागवत सप्ताह परंपरेचा हा आधारभूत असा हा ग्रंथ आहे, त्यामुळे या पुराणाविषयीची माहिती जाणून घेणे क्रमप्राप्तच आहे. मागील लेखात समग्र पुराण-वाङ्मयात आढळणाऱ्या पाच लक्षणांबद्दल आपण जाणून घेतले आहे. परंतु बरेचदा पुराणांचे वर्गीकरण महापुराणे आणि उपपुराणे अशा प्रकारात केले जाते. त्यापैकी भागवत पुराणाची गणना महापुराणात होते. याचे कारण पुराणांची दशलक्षणे यात आढळून येतात म्हणून त्याला महापुराण म्हणून म्हटले जाते. सर्वप्रथम या लक्षणांच्या दृष्टीने भागवतपुराण कसे वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि ते महापुराण म्हणून गणले जाते याविषयी जाणून घेणे उचित ठरेल. जे पुराण दशलक्षणात्मक आहे त्यास महापुराण संबोधले जाते. भागवत पुराण आणि ब्रह्मवैवर्त पुराण ही दोन पुराणे या विभागात येतात. उपपुराण ही संज्ञा लक्षणांवर आधारित नसून जी पुराणे तुलनेने कमी महत्त्वाची आहेत त्यांना उपपुराण संबोधले गेले आहे. पुराणांमधे सर्वसाधारणपणे आढळणाऱ्या पंचलक्षणापेक्षा जी अधिक लक्षणे भागवत पुराणात अंतर्भूत आहेत त्याचा प्रथम उल्लेख द्वितीय स्कंधात आला आहे तो पुढीलप्रमाणे

अत्र सर्गो विसर्गश्च स्थानं पोषणमूतयः ।
मन्वन्तरेशानुकथा निरोधो मुक्तिराश्रयः।।
भागवत पुराण २.१०.१

भागवत पुराणात सर्ग, विसर्ग, स्थान, पोषण, ऊति, मन्वन्तर, ईशानुकथा, निरोध, मुक्ती इत्यादी लक्षणे आढळतात. येथे सर्ग म्हणजे उत्पत्तीपूर्वीच्या तत्त्वांची निर्मिती, विसर्ग म्हणजे चराचर सृष्टीची निर्मिती, स्थान म्हणजे स्थिती राखणे, पोषण म्हणजे भगवंताचा अनुग्रह आणि उति म्हणजे कर्मवासना असा अर्थ अपेक्षित आहे. मन्वन्तर व त्यांचे अधिपती यांच्याविषयीच्या कथा, ईश्वराविषयीच्या कथा, तर निरोध म्हणजे जीवांचे भगवंतामध्ये उपाधींसहित लीन होणे, मुक्ती म्हणजे वास्तविक स्परूपात स्थिर होणे तर आश्रय म्हणजे संपूर्ण जगताच्या उत्पत्ती आणि प्रलय याचे आधारतत्त्व परमात्मा याबद्दलचे कथन आहे.

जीव, जगत आणि सृष्टि याविषयीचे कथन तसेच जीवाची निर्मिती, परमात्म्यामध्ये विलीन होण्यापर्यंत जो पारमार्थिक प्रवास दिसतो त्याविषयीचे कथन या पुराणांत आढळते. या लक्षणांच्या आधारावरच हे पुराण महापुराण गणले जाते.

याव्यतिरिक्त पुराणांचे अन्य प्रकारेदेखील वर्गीकरण केलेले दिसते. मत्स्यपुराणातील संदर्भानुसार पुराणांचे वर्गीकरण सात्त्विक, राजस आणि तामस या तीन विभागांत केलेले

दिसते. विष्णूचे वर्णन असणारी पुराणे सात्त्विक, ब्रह्मा तथा अग्नी या देवतांचे वर्णन असणारी पुराणे राजस तर शिव या देवतेचे वर्णन करणारी पुराणे तामस म्हणून गणली जातात. भागवत पुराण हे विष्णू या देवतेस समर्पित आहे. विष्णूचे विविध अवतार आणि प्रामुख्याने कृष्णचरित्र वर्णिले असल्याने हे पुराण सात्त्विक म्हणून गणले जाते.

**श्रीमद्भागवत – रचना**

भागवत पुराणात बारा स्कन्ध आणि १४००० श्लोक आहेत. यामध्ये पूर्वी नमूद केल्या गेलेल्या दहा लक्षणांसंबंधीच्या विषयांची मांडणी केली गेली आहे. श्लोकसंख्येच्या दृष्टीने दशम स्कंध सर्वात मोठा आहे आणि पूर्वार्ध तसेच उत्तरार्ध अशा दोन विभागात विभागला गेला आहे.

**श्रीमद्भागवत – शैली**

ग्रंथरचनेत प्रामुख्याने अनुष्टुभ छंद आणि काही ठिकाणी बृहती छंदाचा वापर केला आहे. भाषा तत्त्वज्ञान सांगत असली तरीही रसाळ आहे. तसेच प्रामुख्याने अनुष्टुभ छंद वापरल्यामुळे संस्कृतही सोपे आहे. तसेच श्रीकृष्णासारख्या देवतेचे चरित्र असल्यामुळे त्यात भावोत्कटता आहे. त्यामुळे विषय वैविध्यदेखील आले आहे.

**श्रीमद्भागवत – विषय**

संपूर्ण पुराण विष्णूदेवतेस समर्पित आहे. विष्णूच्या विविध अवतारांच्या कथा यामध्ये येतात. या अवतारांपैकी श्रीकृष्णाच्या चरित्राचे आणि त्याच्या विविध लीलांचे तत्त्वज्ञानात्मक वर्णन करणे हा या पुराणाचा प्रमुख उद्देश आहे. या दृष्टीने दशम स्कंध हा अतिशय महत्त्वाचा मानला जातो. भगवंताच्या आणि अनेक वैष्णवांच्या कथा येथे वर्णिल्या आहेत ज्यांच्या श्रवणाने भक्तिभाव निर्माण होतो, वाढीस लागतो आणि पोषित होतो. म्हणूनच भागवत पुराण म्हणजे भक्ती असे समीकरणच रूढ आहे. याशिवाय पूर्वी उद्धृत केलेले पुराणातील दहा विषयांचे स्पष्टीकरण विविध गाथा, आख्याने, उपाख्याने यांच्या माध्यमाने वर्णन केले आहेत.

या ग्रंथाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यापैकी एक म्हणजे विविध स्तुती आणि दुसरे म्हणजे गीते. ग्रंथामध्ये अत्यंत प्रसिद्ध अशा स्तुती आल्या आहेत. विविध प्रसंगी जी भगवंताची स्तुती भक्तांनी गाईली आहे, त्यांचा उल्लेख त्या त्या स्तुतीमध्ये आला आहे. उदाहरणार्थ कुंती स्तुती, भीष्म स्तुती, प्रह्लाद स्तुती इत्यादी. तसेच विविध गीते यामध्ये अंतर्भूत आहेत. जसे, गोपी-गीत, वेणु-गीत, भ्रमर-गीत, भिक्षु-गीत इत्यादी. आत्यंतिक भावावेगात ज्या उत्कट भावांचे प्रकटीकरण झाले त्यांना गीत म्हणून संबोधले गेले आहे. अशा गीतांमूळे एक वेगळाच भावोत्कट स्थितीचा परिचय वाचकास होतो. नवरसांनी पोषित अशा या प्रासादिक ग्रंथाची रचना अत्यंत सुंदर आहे यात शंकाच नाही. म्हणूनच तर म्हटले आहे की,

निगमकल्पतरोर्गलितं फलं<br>
शुकमुखादमृतद्रवसंयुतम्

पिबत भागवतं रसमालयम्
मुहुरहो रसिका भुवि भाविकाः ।। भागवत पुराण १.१.३.

अहो भाविकजन, शुकमुनींच्या मुखातून निर्माण होणारे अमृतमय भागवत जे वेदकल्पतरूपासून निघालेले फळ हे प्रत्येक क्षणी जोवर जीवन आहे तोवर चाखत रहा.

**श्रीमद्भागवत – भक्ती**

ग्रंथामध्ये नवविधा भक्ती प्रतिपादित केली गेली आहे.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।
भागवत पुराण ७.५.२३

(श्रवण, कीर्तन, विष्णुस्मरण, विष्णूंची चरणसेवा, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन इत्यादी भक्तीचे नऊ प्रकार आहेत.)

या प्रत्येक भक्तीचे प्रतीकात्मक चरित्र भागवतामध्ये आढळते.

श्रवणभक्ती – परिक्षित; संकीर्तनभक्ती – नारद; नामस्मरणभक्ती – प्रह्लाद; अर्चनभक्ती – पृथु; वंदनभक्ती – अक्रुर; पादसेवनभक्ती – लक्ष्मी; दास्यभक्ती – हनुमान; सख्यभक्ती–अर्जुन; आत्मनिवेदनभक्ती – बलिराजा.

या नवविधा भक्तीचे आचरण करणाऱ्या भक्तांची चरित्रे या भागवत पुराणात समाविष्ट आहेत. अशा प्रकारे भागवत पुराण हे भक्तीचा पुरस्कार करणारे पुराण आहे. पुढील श्लोकात हेच स्पष्ट होताना दिसते.

स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे ।
अहैतुक्यप्रतिहता ययात्मा सम्प्रसीदति ।।
भागवत पुराण १.२.६.

भगवंताची अहेतुक आणि अप्रतिहत (अखंड) अशी भक्ती असणे हाच मानवाचा श्रेष्ठ धर्म होय.

ग्रंथाच्या उपसंहारात देखील भगवंताची भक्ती निर्माण होण्यासाठी त्याचीच प्रार्थना केली आहे. म्हणूनच याच्या वाचनाने, श्रवणाने

भगवंताबद्दलची भक्ती वृद्धिंगत व्हावयास मदत होते असे मानले जाते.

**श्रीमद्भागवत – काळ**

विविध अभ्यासक जसे दीक्षितार, हाजरा, डांगे, काणे इत्यांदींच्या मतांचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की काहींच्या मते हे पुराण ३–या शतकात निर्माण झाले तर काहींच्या मते ६वे शतक तर अन्य काहींच्या मते नववे शतक हा या पुराणनिर्मितीचा काळ असावा. ग्रंथ निर्मितीच्या काळाची पूर्वमर्यादा इ. स. ३ रे शतक तर उत्तरमर्यादा इ.स. ९वे शतक इतकी आढळते. यांच्या सर्व मतांचा परामर्श घेताना या ग्रंथांची निर्मिती इ.स. ६व्या शतकात झाली असावी असे हाजरा यांचे मत सामान्यतः ग्राह्य धरले जाते. विष्णूचे विविध अवतार तसेच कृष्णलीला असलेले हरिवंश पुराण आणि विष्णुपुराण यांचा काळ भागवत पुराणांच्या आधीचा असल्याने भागवत पुराणाचा काळ ४थ्या शतकापूर्वी

नेता येत नाही. तसेच ६व्या शतकानंतरही हा मानता येत नाही. त्यामुळे ६व्या शतकात या पुराणाची निर्मिती झाली असावी हे मानणे संयुक्तिक ठरते.

### श्रीमद्भागवत – तत्त्वज्ञान

भागवत पुराण अद्वैत सिद्धांत सांगते. भक्ती, ज्ञान, वैराग्य हे मार्ग साधकाला ज्या अंतिम ध्येयाकडे घेऊन जातात ते तत्त्वज्ञान म्हणजे अद्वैत तत्त्वज्ञान हे होय. भागवत पुराणाने तत्त्वज्ञान रसाळ शैलीमध्ये मांडले. ब्रह्मतत्त्व सर्व जीवांमध्ये आहे, हे जाणून घेणे म्हणजे अध्यात्म. जीव-ब्रह्म यांचे ऐक्य अनेक आख्यानांच्या माध्यमामधून प्रस्थापित केले आहे. हा ग्रंथ अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रसार करतो. अद्वैत तत्त्वज्ञानात जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य अनुस्यूत आहे. पण भागवतप्रणीत भक्तीमार्गात भक्त आणि देव असे द्वैत वरकरणी अध्याहृत आहे. पण या द्वैतातून अंतिमतः सत्यापर्यंत पोहोचल्यावर जीवात्मैक्यापर्यंत पोहोचणे हे ध्येय दिसून येते.

### श्रीमद्भागवत – महत्त्व

#### प्रस्थानत्रयी

भारतीय दर्शन परंपरेमध्ये प्रस्थानत्रयी मानली जाते. म्हणजे ज्यातून तत्त्वज्ञान उगम पावले असे महत्त्वाचे ३ ग्रंथ मानले जातात. त्यात वैदिक प्रस्थानत्रयी, पौराणिक प्रस्थानत्रयी व संताची प्रस्थानत्रयी यांचा समावेश होतो. यातील पौराणिक प्रस्थानत्रयीमध्ये रामायण, महाभारत आणि भागवत पुराणाचा समावेश होतो. अनेक भक्तिवर्धक ग्रंथ किंवा पुराणे असतानाही, समग्र पुराण वाङ्मयातून या प्रस्थानत्रयीमध्ये भागवत पुराणास अढळ स्थान प्राप्त आहे यावरूनच या पुराणाचे महत्त्व सिद्ध होते. वैदिक प्रस्थानत्रयीमध्ये उपनिषदे, भगवद्गीता आणि ब्रह्मसूत्रे समाविष्ट आहेत. या प्रस्थानत्रयीचे स्वरूप तत्त्वज्ञानपर असून पौराणिक प्रस्थानत्रयी आख्यान, उपाख्यान, गाथा या स्वरूपात आहे. साहजिकच विषयासंबंधी एकाग्रतेसाठी आणि आकलनाच्या दृष्टीने पौराणिक प्रस्थानत्रयी अधिक सुकर आहे. म्हणूनच त्याचे महत्त्व आहे. त्यामूळेच भागवत पुराणाचेही महत्त्व आहे.

#### टीका

साधारणपणे एखाद्या ग्रंथाची लोकप्रियता त्या ग्रंथावरील उपलब्ध संस्कृत अथवा प्रादेशिक टीका ग्रंथावरून कळून येते. समग्र पुराणवाङ्मयापैकी श्रीमद्भागवतावर अनेक टीकाग्रंथ लिहीलेले दिसतात. याच एका निकषावरूनही या ग्रंथाचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. भागवत पुराण विष्णुभक्ती आणि प्रामुख्याने कृष्णभक्तीचा पुरस्कार करत असल्याने रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य अशा वेदांतातील आचार्यांनी प्रस्तुत ग्रंथाचा प्रस्थानत्रयीत समावेश केला आहे. विशिष्टाद्वैत, द्वैत आणि शुद्धाद्वैत इत्यादी आचार्यप्रणीत मतांचे विविध संप्रदाय आहेत. या संप्रदायांनी या ग्रंथाचा आधारभूत ग्रंथ म्हणून स्वीकार केला आणि त्या संप्रदायातील आचार्यांनी त्यावर ग्रंथ लिहिले अथवा टीका लिहिल्या. काहींनी संपूर्ण भागवतावर तर

काहींनी विशिष्ट भागांवर टीका लिहिल्या आहेत. त्यामध्ये अद्वैत तत्त्वज्ञानावर आधारित श्रीधरस्वामीविरचित भावार्थदीपिका ही टीका अत्यंत प्रसिद्ध आहे आणि निरूपणासाठी तिचा आधार भागवतकार घेताना दिसतात. सुदर्शनसूरी यांची शुकपक्षीया विशिष्टाद्वैत मताचे प्रतिपादन करते. विजयध्वज यांनी रचलेली पदरत्नावली ही टीका द्वैतमताचे प्रतिपादन करते. वल्लभाचार्यांची सुबोधिनी ही टीका शुद्धाद्वैत मताचे प्रतिपादन करते. चैतन्यमताचे प्रतिपादन करणाऱ्या बृहद्वैष्णवतोषिणी, क्रमसंदर्भ, सारार्थदर्शिनी या टीका अनक्रमे सनातनगोस्वामी, जीवगोस्वामी आणि विश्वनाथ चक्रवर्ती यांनी रचल्या आहेत.

काही टीका संपूर्ण भागवतावर आहेत तर काही फक्त दशम स्कंधावर आहेत. याव्यतिरिक्त प्रादेशिक भाषांमध्येदेखील या ग्रंथावर पुष्कळ भाष्य आणि टीका लिहिल्या गेल्या आहेत. महाराष्ट्राविषयी बोलायचे तर एकनाथ महाराजांनी लिहिलेली एकादश स्कंधावरील एकनाथी भागवत ही टीका संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रसिद्ध आहे. भक्तीवरील स्वतंत्र आणि अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणून मान्यता पावलेला आहे. येथील भागवतकार तसेच साधकदेखील या ग्रंथाचे अभ्यासक आहेत. तसेच एकनाथांनीच रचलेला द्वितीय स्कंधामधील चतुःश्लोकी भागवतावर आधारित 'चतुःश्लोकी भागवत' हा मराठी भाषेतील ग्रंथ देखील प्रसिद्ध आहे.

अशा प्रकारे हा प्रासादिक ग्रंथ आजही विविध भक्तांच्या रोजच्या आह्निकामध्येही समाविष्ट आहे, विविध प्रकारे अभ्यासला जात आहे; तसेच भागवत सप्ताह परंपरेच्या विराट स्वरूपातही लोकांच्या भेटीस येतो. अनेक पुराणे आणि उपपुराणे अस्तित्वात असूनही भागवत पुराणाच्या कथांवर आधारित भागवत सप्ताह आज अनेक शतके भारतात केला जातो ही बाब या ग्रंथाचे महत्त्व आणि चिरस्थायित्व अधोरेखित करते.

**दिशा प्रसादे**

•••

(पृष्ठ क्र.१२ वरून... **संत रामदासस्वामी समर्थ प्रणीत ''दासबोधातील उत्तम योजकाची गुणवैशिष्ट्ये''**)

केले आहे. MANAGEMENT OF HARMONY BETWEEN OWNER & WORKING STAFF हे सूत्र त्यावेळी त्यांनी विशद केले. INDUSTRIAL HARMONY मुळे मग संप इ. गोष्टी टळतात व प्रगती होते.

(लेखाचा उर्वरित भाग पुढील अंकी.....)

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३
Email : vasantgod@gmail.com

•••

मानस पूजेचा शास्त्रशुद्ध , सखोल व सविस्तर विचार आगम शास्त्रात केलेला दिसतो. मानस पूजेला मानसयाग असे पारिभाषिक नाव आहे. आणि त्याचे महत्त्व आगम धर्मात फार मोठे आहे . मूर्तिपूजेच्या पंथामध्ये वेदांना निगम असे संबोधन आहे. देवालय धर्माच्या आचार पद्धती आणि ग्रंथांना आगम असे म्हणतात. विष्णूचा तो वैष्णवागम शिवाचा तो शैवागम व शक्तीचा म्हणजे देवीचा तो शाक्तागम असे तीन प्रमुख आगम आहेत.

वैष्णवागमाच्या अंतर्गत दोन उपागम आहेत एक पांचरात्र आणि दुसरा वैखानस. पांचरात्राचा कल तांत्रिक पूजेकडे आहे, मात्र वैखानसाला मूर्तिपूजेसाठी वेद मंत्र अभिप्रेत आहेत. पांचरात्र संप्रदायात दीक्षा देऊन प्रवेश मिळतो मात्र वैखानस केवळ जन्मजातच असतो. पांचरात्र प्रसाराचे रहस्य अशा दीक्षेच्या माध्यमातून मुक्त प्रवेश आहे, त्यात आहे. त्यांचे धोरण असे आहे की ''दीक्षयेत् मेदिनीं सर्वां किमु यान् समुपस्थितान्।'' त्यामुळे इसवीसना पूर्वीच्या हेलीओडोरस नावाच्या ग्रीक अधिकाऱ्याने इंदूर जवळ मन्दसोर येथे विष्णूध्वजा उभारली. त्याच्या शिलालेखामध्ये ''हेलीओडोरेण भागवतेन विष्णुध्वजेयं कारिता।'' त्यानंतर काश्मिर शैवागमातील स्पंदप्रदीपिका या ग्रंथाचा नवव्या शतकातील लेखक उत्पलाचार्य वैष्णव झाला आणि त्याने उत्पल वैष्णव असे नाव धारण केले . त्यानंतर ११ व्या शतकात रामानुजाचार्यांनी देशभर हजारो लोकांना वैष्णव धर्माची दीक्षा दिली. ते धर्मप्रसारासाठी समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचले.

वैखानस आगमाचे दक्षिणेतील प्रमुख क्षेत्र तिरुपती हे आहे.

पांचरात्र आगमाची दोन क्षेत्रे तमिळनाडू मध्ये आहेत : विष्णू कांची आणि श्रीरंगम् । व कर्नाटकातील यादवाद्रि किंवा मेलकोटे येथील नारायण मंदिर.

पांचरात्र आगमात पूजेचे दोन प्रकार आहेत : अंतर्याग व बहिर्याग. बहिर्याग करण्यापूर्वी साधकांनी अंतर्याग म्हणजे मानसपूजा करावी असा संकेत आहे. मानसपूजा म्हणजे डोळे मिटून देवपूजेची सर्व कृती मनाने करणे. मानसपूजे प्रमाणे इतरही काही विधी मनाने करावेत असा संकेत आहे. त्यानुसार मनोमयी मूर्ति, मानस स्नान, मानस जप, मानस होम आणि मानसी सृष्टि असे शब्द आगमात आढळतात. आगमान्तर्गत – मानस पूजेत असे मनोमय विषय अभिप्रेत आहेत. आगमातील मानसयागावरील अध्यायात मंदिर, त्यातील विविध भाग हे कल्पनेने कसे निर्माण होतात त्याचे सूक्ष्म वर्णन केलेले आहे. वस्तुतः पूजक, पूजेचा हा सर्व देखावा रूढ अर्थाने निर्माण करीत नाही तर तो परमेश्वराने पूर्वीच निर्माण केलेल्या सर्व गोष्टी कल्पनाशक्तीने जाणून घेतो.

पूजकाने सर्व पंच महाभूते, आधिभौतिक तत्त्वे, देवदेवता, ऋषि, मुनि आणि वेद, इत्यादी सर्वांना आवाहन करून केलेली पूजा, त्यांना प्रत्यक्ष येऊन स्वीकारावी लागते. त्यानंतर त्या सर्वांचे विलीनीकरण परमेश्वराच्याच रुपात होत आहे अशी काल्पनिक अनुभूती पूजक घेत असतो; उदाहरणार्थ, त्याने क्ल्पेनेने आणलेली गंगा ही परमेश्वराला अर्पण केलेले अर्घ्यामृतच आहे. या सर्व कृतीस लययाग असे म्हणतात. त्यानंतर पूजकाने भोगाभिध यागास सुरुवात करायची असते. भोगाभिध याग म्हणजे नेहमी करतात त्या गंध, फूल, धूप दीप, नैवेद्य इत्यादी षोडशोपचार पूजेची प्रतिकृतीच होय. यामध्ये प्रथम पूजक यथाशक्ती मनोभावे केलेली मानसपूजा परमेश्वराने स्वीकारावी अशी प्रर्थना करतो.

मानस पूजेत पूजकाने ईश्वरास अर्पण केलेल्या सर्व वस्तू या संकल्पजनित असतात. त्यांचे वैशिष्ट्य असे की त्या केवळ विपुल असतात असे नव्हे तर त्या अतिप्रचंडही असतात. पूजक या वस्तू सप्तपाताळातून देखील गोळा करून आणू शकतो. शिवाय त्या सर्वोत्तम, पवित्र आणि अविनाशी असतात. अर्थात् हे सर्व काल्पनिकच असते. उदाहरणार्थ ध्यान धारणेने निर्माण केलेला अग्नी हा साधा सुधा नसून चिद् अग्नी असतो. मंत्र, न्यास, मुद्रा या सर्व गोष्टी काल्पनिक असून प्रत्यक्ष दृश्य स्वरूपात त्यातले काहीच नसते.

हे सर्व पूजाकर्म जेंव्हा पूर्ण होते, तेंव्हा ते परमेश्वरास अर्पण करायचे. मग ते स्वकृत संकल्पाने स्व-हृदयात साठवून ठेवायचे. त्यानंतर पूजक परमेश्वराच्या अनुमतीने बाह्य याग करू शकतो. संकेताप्रमाणे बाह्य याग केल्याशिवाय, पूजकास मानस यागाचे विसर्जन करता येत नाही.

मानस याग करणारा पूजक हा वार्धक्य, रोग, अपमृत्यु, सांसारिक बंधने, आणि पापकर्म, या सर्वापासून मुक्त होऊन शाश्वत सुखाचा मानकरी होतो असे आगम ग्रंथात वर्णन केलेले आहे. मानस याग हा सर्वोत्तम मार्ग आहे व मानस पूजा करणारा पूजक सर्व श्रेष्ठ आहे असेही वर्णन आढळते. मानस पूजा करणे जरी प्रथमतः कठीण वाटले तरी ते सवयीने सहज साध्य बनते. मात्र ज्यांची यावर श्रद्धा नाही किंवा मानस पूजा करण्याची ज्यांची पात्रता नाही अशा लोकांना पूजकाने मानस पूजेचे रहस्य सांगू नये. मानस याग हि पूजेची परिपूर्ण प्रक्रिया आहे व मानस स्नान, मानस जप, मानस होम इत्यादी मानस पूजेचे भाग आहेत.

आद्य शंकराचार्यांनी सांगितलेली परापूजा आणि आगमातील मानस पूजा, भूतशुद्धी इत्यादी गोष्टीत खूप साम्य आहे. मात्र त्यात सूक्ष्म फरकही आहे. शंकराचार्यांना अद्वैत तत्त्वज्ञानामुळे 'अद्वयस्य कुतो नतिः?' असा प्रश्न पडतो. विनायक कवींनी त्याची मराठीत छान रुपांतर केले आहे : अभिन्न तू मी मग कवणाचे लागावे पायी ..

मानसपूजा योग साधनेपेक्षा निराळी आहे . या पूजेत सर्व गोष्टी केवळ जाणिवेतच

करावयाच्या असतात. योगात मात्र जाणिवेतील कृतींना मान्यता नसते. या ठिकाणी सर्व इंद्रियां प्रमाणेच मन कल्पनाशक्ती आणि विचार स्थिर करावे लागतात. मानस याग करणाऱ्या साधकाला त्याची कल्पनाशक्ती अधिकाधिक सूक्ष्म व कार्यक्षम करावी लागते. देवालयातील अर्चकाला मानस पूजेत देऊळ आणि पूजा सामग्री यांचा संपूर्ण देखावा कल्पनेने उभारावयचा असतो. व तो मानसयाग पूर्ण होईपर्यंत तसाच्या तसा मनःचक्षुसमोर ठेवायचा असतो. थोडक्यात म्हणजे, मानस यागात एकाग्रता पुरत नाही तर समग्रतेची साधना करावी लागते. समग्रत्व म्हणजे अखिल विश्वाच्या ठिकाणी एकाग्रत्व. मानस याग करणारा साधक प्रथम मनोमयी मूर्ती कल्पितो. नंतर त्या मूर्तीसाठी आसन, आणि परिवारदेवता देखील कल्पनेनेच निर्माण करतो. व त्या सर्व देवतांना योग्य त्या ठिकाणी स्थानापन्न करतो. नंतर पूजेचे सर्व साहित्य एकत्र करून त्या त्या जागी ठेवतो. नंतर तो पूजेस सुरुवात करतो. पूजा संपेपर्यंत हा सर्व देखावा जशाचा तसा एक क्षण देखील अदृश्य न होऊ देता नजरेसमोर ठेवावा लागतो. यदाकदाचित चुकून क्षणभर जरी हा देखावा दृष्टीआड झाला तरी हि सर्व प्रक्रिया पुनः करावी लागते. कल्पनेतील देखाव्यात पुजाऱ्यास स्थळ आणि काळ या दोन्ही बाबतीत जागरूक राहावे लागते. आदर्श मानस पूजेत देवतेच्या किंवा पूजा साहित्याच्या जागेची अदला बदल होऊन चालत नाही. ते दृश्य जसेच्या तसे ठेवून पूजकास षोडशोपचार - पूजा नियतक्रमाने पुढे पुढे चालवावी लागते. पूजा चालू असतांना पूजा साहित्याच्या महत्त्वानुसार त्याचा अनुक्रम आणि पौर्वापर्य याकडे अर्चकाचे नित्य  लक्ष असावे लागते. कारण त्यात थोडी जरी चूक झाली तरी मानस पूजा सुरवातीपासून पुन्हा करावी लागते. स्थळ काळाचे अवधान हे मानस पूजेतील महत्वाचे अंग आहे.

मानस-पूजा म्हणजे संकल्पजनित पूज्य देवता, पूजास्थान आणि पूजा साहित्य यांचे अवधान बाळगून केलेली क्रिया ही आदर्श होय. मानस-यागातील समग्रत्वाची साधना एकाग्रत्वाच्या साधनेपेक्षा बरीच कठीण आहे असे दिसते.

मानस पूजेचे आणखी एक वैशिट्य म्हणजे बाह्य पूजेप्रमाणे त्यासाठी कुठल्याही सामग्रीची गरज नसते . सर्व गोष्टी संल्क्ल्पानेच उत्पन्न होतात . ही  सर्व प्रक्रिया शरीरनिरपेक्ष असते. जर एखाद्या साधकाने मानस पूजा प्रक्रियेत सिद्धी प्राप्त केली तर त्याच्यापाशी शरीर असो वा नसो पूजेत व्यत्यय येणार नाही. कारण या प्रक्रियेसाठी मनोबल आवश्यक आहे . मानस पूजा शरीरनिरपेक्ष असली तरी ती अवधानसापेक्ष आहे. बाह्यपूजा ही  सवयीने प्रतिक्षिप्त क्रिया बनते. अशा वेळी चित्त जागेवर नसले तरी पूजा होऊ शकते. मानस-पूजेत मात्र दुर्लक्ष अजिबात चालत नाही.

वैष्णव, शैव, शाक्त इत्यादी आगमात मानस-यागाबाबतीत  बरेच साम्य आहे पण शैवागमात आपण 'शिवो भूत्वा शिवं यजेत्।'

हे वचन ऐकतो. शाक्त आगमात देखील 'देवी भूत्वा तु तां यजेत् ।' असे वचन येते.

वैष्णवांच्या विशिष्टाद्वैत सिद्धान्ताला पूज्य-पूजक-ऐक्य अभिप्रेत नाही. सिद्धांतातील या भेदामुळे जसा मानस पूजेत फेरफार आढळणार तसा आराध्य देवतेच्या भिन्नतेमुळे मानस - यागात तेव्हढा भेद अपेक्षित आहे. प्रत्येक पूजकाच्या इष्ट देवतेला अनुसरून त्या त्या देवतेस प्रिय असणाऱ्या वस्तूंचा मानस पूजेत ही समावेश होतो.

बाह्य - याग व अंतर - याग या दोहोत अंतर-यागाचे श्रेष्ठत्व एकमताने मानलेले आहे. परंतु हे दोन प्रकार वेगळे नसून परस्पर पूरक आहेत. एखादा गृहस्थ बाह्य यागा ऐवजी केवळ मानस पूजा करू शकतो. मात्र मंदिरातील अर्चकास असे करून चालत नाही. मंदिराचा अर्चक हा सर्व भक्तांचा प्रतिनिधी असल्याने त्याला मानस पूजा आणि बाह्य पूजा या दोन्ही अतिशय मनोभावे व दक्षतेने कराव्या लागतात. आगमानुसार मंदिरातील पुजाऱ्याला मानसपूजा करण्याची कुवत असली पाहिजे. अशा तऱ्हेने मंदिरांतर्गत मूर्तिपूजेच्या धर्माने मानस पूजा सविस्तर वर्णन करून मूर्तिपूजेला एक अध्यात्मिक जोड दिलेली आहे.

आगमामध्ये अशा तऱ्हेने मानस पूजेचा विधी घरातील आणि देवालयातील पूजकांसाठी जो सांगितलेला आहे तो आपण पहिला. आता सांप्रत काळात मानस पूजा करणाऱ्या अधिकारी व्यक्ति आहेत का ? या प्रश्नाचे उत्तर हो असे आहे. जवळ जवळ २५ वर्षांपूर्वी बनारस हिंदू विश्विद्यालयात एक प्राच्य विद्येवर चर्चा सत्र झाले होते, त्यावेळी जुन्या पिढीतील मानस पूजेवरील एक अधिकारी पुरुष पं. गोपीनाथ कविराज यांचे शिष्य सीताराम कविराज चर्चासत्रासाठी उपस्थित होते. त्यांनी एक दिवस पं. मदनमोहन मालवीय सभागृहात सकाळी ९ वाजता मानस पूजेचे प्रात्यक्षिक सादर केले. आणि त्यात आम्हा सर्व निबंध - वाचकांना सक्रियपणे सहभागी होण्याचे निमंत्रण दिले. एक तासभर ते मानस पूजेची प्रक्रिया समजावून देत देत, आम्हा सर्वांना काही विधी करावयास सांगत. अशा तऱ्हेने एक तासभर चाललेले ते मानस - पूजेचे प्रात्यक्षिक हा आम्हा सर्वांना अलौकिकपणे त्यांनी घडविलेला साक्षात्कारच होता. तो प्रसंग अविस्मरणीय आहे. मानस पूजेची ग्रांथिक आणि सैद्धान्तिक प्रक्रिया सांगून झाल्यानंतर या अलौकिक अनुभूतीची एक झलक सर्वांसमोर ठेवून मी या विषयाचा समारोप करतो.

**प्रा. प्रभाकर आपटे**

भ्रमणध्वनी : ७०२१७७६५१५

●●●

रुचीनां वैचित्र्याद् रुजु कुटिल नानापथजुषाम्।
नृणाम् एको गम्यः त्वम् असि पयसाम् अर्णवः इव ।

महिम्न स्तोत्रातील वरील श्लोकात परमार्थाचे एकमेव गन्तव्य असणाऱ्या परमेश्वराचा साक्षात्कार मानवी स्वभावानुरूप विविध होतो. त्यानुसार त्याच्याकडे जाण्यासाठी वेगवेगळया सरळ किंवा नागमोडी मार्गांचा अवलंब साधक करीत असतात असे सांगितले आहे . भारतीय अध्यात्माचा कल, रुचिवैचित्र्य हे परमार्थ साधनेला बाधक नसून पोषकच आहे असे मानण्याकडे आहे. साहजिकच आपल्या धर्मात हटयोगापासून मधुरऱ्स भक्ती पर्यंत, पंचाग्निसाधनापासून पंच मकारापर्यंत परस्पर - विसदृश असे परमार्थ साधनेचे मार्ग रूढ झालेले दिसून येतात. प्रत्येक संप्रदायाच्या अध्यात्मिक प्रणालीचे प्रतिबिंब त्या त्या संप्रदायाच्या अनुयायांच्या सामूहिक व कौटुंबिक जीवनातहि उमटलेले दिसते. यज्ञ वैदिक धर्माची श्रौत व गृह्य कर्मानुष्ठानाची मांडणी व मूर्तीपूजेच्या धर्माची आलयार्चना व गृहार्चना अशी मांडणी ही याचीच उदाहरणे म्हणता येतील. स्मृति, पुराणे व इतर ग्रंथात या दोन्ही प्रकारच्या म्हणजे निगमोक्त व आगमोक्त धर्माचरणाचे विस्तृत विवेचन आढळते . मूर्तिपूजा प्रमुख मानणाऱ्या आगम धर्मात शैव, वैष्णव इत्यादी भेद असले तरी मंदिरांतर्गत सार्वजनिक मूर्तिपूजा व गृहांतर्गत कौटुंबिक मूर्तीपूजा हे त्यात साम्य आहे व या दोन प्रकारच्या उपासनेभोवती त्यांच्या अनुयायांच्या जीवन पद्धतीची उभारणी झाली आहे. जगताची ईशावास्य स्वरूपात अनुभूति देणारी तात्त्विक विचारसरणी आगम धर्माच्या मुळाशी असल्याने सुखसमृद्धीने भरलेल्या ऐहिक जीवनाला पाप समजून त्याच्याकडे तुच्छतेने न पाहता त्याचा उपभोग रसिकतेने पण ''तेन त्यक्तेन भुन्जीथाः'' या भावनेने घेण्याची शिकवण या धर्मातून मिळते. मूर्तीपूजेचा मूलभूत सिद्धांत पांचरात्र मतात प्राचीन काळी, प्रामुख्याने मांडला गेला आहे त्याचा अल्प परिचय प्रस्तुत लेखात करून घ्यावयाचा आहे.

पांचरात्राने भोवतालच्या जगताकडे व त्या मागे असलेल्या संचालक शक्तीकडे भावात्म दृष्टीनेच पाहिले आहे. हे जग सत्य आहे, त्यात दिसणाऱ्या विविधतेसह रुची वैचित्र्यासह व त्यामागे असणारे अंतिम सत्य हेहि विविधतेने व रुचिवैचित्र्याने नटलेले आहे, अशी या संप्रदायाची धारणा आहे. अंतिम सत्य हे मुळातच बहुरूपी आहे असा पांचरात्राचा सिद्धांत आहे . पर-व्यूह-विभव-अंतर्यामी व अर्चा असे या सत्याचे पंचविध आविष्कार आहेत, यातील परस्वरूप हे सर्व श्रेष्ठ. ते ज्ञानगम्य म्हणजे केवळ तर्कानेच जाणता येते, ज्ञानमार्गी साधकांना या स्वरूपाचे ज्ञान प्रयत्न साध्य आहे. परस्वरूपाचे दृश्य

स्वरूपात म्हणजे आपल्याला सभोवार दिसणाऱ्या विश्वाच्या स्वरूपात जे रुपांतर होते त्याची प्रक्रिया व्युहाविष्काराद्वारे स्पष्ट केली आहे. विश्व स्वरूपाचे योगे परमात्मा अभिव्यक्त जगताचे संचालन करतो असे मानले आहे. विश्वाच्या सृष्टि, स्थिती, लयात्मक प्रक्रियेला प्रतिकूल असणाऱ्या शक्तींचा निग्रह व अनुकूल शक्तींचा अनुग्रह  असे या विभवाविष्काराचे विविध कार्य असते. असे एकूण विभवाविष्कार ३९ आहेत व त्यात दशावतार अंतर्भूत आहेत. व्यूह व विभव यांची उपासना आगम ग्रंथात सविस्तर सांगितली आहे. चौथा अविष्कार हा प्राणिमात्रांच्या अंतःकरणात होत असतो. त्याला हार्द किंवा अंतर्यामी म्हणतात. या स्वरूपाची उपसना योग मार्गाने ध्यान धारणेच्या आधारे करावयाची. पाचवा अविष्कार अर्चा किंवा मूर्तीच्या रूपाने होणारा आविष्कार. असे पंचविध आविष्कार हे परमेश्वराचे साक्षात स्वरूपच आहे.

वरील पाचापैकी व्यूह आणि अर्चा हे दोन अविष्कार पांचरात्र मताचे वैशिष्ट्य होय. परस्वरूपाला सांप्रदायिक परिभाषेत परवासुदेव असे मानतात . त्याच्या ठिकाणी सृष्टि उत्पन्न करण्याची सुप्त इच्छा असते तिला 'स्रष्टुम् इच्छा सिसृक्षा।' ती इच्छा जगाच्या रूपाने दृग्गोचर होण्यापूर्वी तिची चार अवस्थांतरे होतात : १ वासुदेव  २ संकर्षण ३ प्रद्युम्न ४ अनिरुद्ध ह्या चार अवस्थानाच आपण परमेश्वराची रूपे मानतो . ऐतिहासिक दृष्ट्या कृष्ण, बलराम, कृष्णाचा पुत्र, आणि त्याचा पुत्र अनिरुद्ध अशी यादव वीरांची नावे आहेत. पण पांचरात्र मताने हे सृष्टि प्रक्रिया सांगणारे पारिभाषिक शब्द आहेत. या चौघांना मिळून चतुर्व्यूह अशी संज्ञा आहे. व्यूह = वि+उह = पसरणे असा आहे. म्हणजे परमेश्वराचे चार आविष्कारातून पसरून दिसणारे रूप. हे व्यूह चार आहेत म्हणून त्या सिद्धांताला चतुर्व्यूह असे नाव आहे.

वासुदेव या शब्दात वस् (= असणे, राहणे) व दिव् (= प्रकाशणे) असे दोन मूळ धातू आहेत. वासुदेव म्हणजे अस्तित्व व प्रकाश असे दोन मूळ धातू आहेत. वासुदेव म्हणजे अस्तित्व व प्रकाश या दोन विशेषणांनी वर्णन करता येण्याजोगे अंतिम सत्य होय. आता त्या सत्याच्या अंतरी सिसृक्षा आहेच, ती जोपर्यंत शांत राहू शकते तोवर तो वासुदेव असतो पण ती शांत राहत नाही, चलबिचल करते, पण तो तिला शांत ठेवण्याचा प्रयत्न करतो. अशा परिस्थितीत दोघांची ओढाताण होते, म्हणून अंतिम सत्याचे अवस्थांतर होते. ती अवस्था म्हणजे संकर्षण (सं + कृष्). हि सिसृक्षा तेव्हढ्यावर थांबत नाही. ती स्वतःचे अस्तित्व प्रकर्षाने भासविते (प्र+दिव् पासून प्रद्युम्न हे नाव झाले) तर हि तिसरी व्यूहाची अवस्था. अशा प्रकारे सिसृक्षा म्हणजे सृजन करण्याची इच्छा बलवत्तर होत जाते आणि पर वासुदेवाला निमूटपणे एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जावे लागते. शेवटी सिसृक्षा हि आंतरिक शक्ती अडविलेल्या (रुद्ध) अवस्थेत न राहता (अ = विरुद्ध) कोश भेदून प्रकट होते. नि + रुध म्हणजे घट्टपणे अडविणे असा अर्थ होतो म्हणून ती

सिसृक्षा घट्ट पकडून ठेवलेली असते असा अर्थ होऊ शकतो. आता वासुदेवाची अनिरुध्द अवस्था आपल्याला चर्म चक्षूंनी दिसू शकते.

या चार व्यूहांची कल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी पांचरात्र मत प्रणेत्यांनी मानवाच्या चार अनुभूतींचा आधार घेतला आहे त्या म्हणजे जागृति, स्वप्न, सुषुप्ति, आणि तुर्यावस्था. त्यातील पहिल्या तीन अनुभूतीतून आपण रोजच जात असतो, चवथी तुर्यावस्था आपल्या सर्वांच्या अनुभवाची नसली तरीदेखील ऐकीव आहे, आणि ती असते हे आपण नाकारत नाही. जागेपणी स्वप्नात आणि झोपेत अथवा समाधी अवस्थेत जीवात्मा चार प्रकारचे ज्ञान अनुभवतो व सुख दुःख उपभोगतो हे आपण साधारणपणे मान्य करतो आता हे ज्ञान व अनुभूती चार प्रकारच्या असतात हे खरे, पण त्यांचा ज्ञाता व भोक्ता जीवात्मा एकच असतो. ज्ञान उपभोग बदलतात पण ज्ञाता भोक्ता बदलत नाही. जीवात्मा चैतन्यमय आहे म्हणून ते त्याला साधते. आता परमात्म्याबद्दल विचार करू. 'परमात्मा देखील चैतन्यमयच आहे म्हणजे तर्काला ताण देऊन तोही अशा चार अवस्थातून ज्ञान व अनुभूती घेत असला पाहिजे असे विधान करण्याचे धाडस आपण करू शकतो. साध्या शब्दात सांगायचे तर परमात्म्याला झोप लागत असणार, स्वप्न पडत असणार, जाग येत असणार व समाधीही लागत असणार.' कारण असे होणे हा चैतन्याचा गुणधर्म आहे आणि तोही ज्ञाता व भोक्ता या स्वरूपात; एकटा एक परमात्मा अविकृत राहून जागृति, स्वप्न, सुषुप्ति, व तुर्या, या चार अवस्थातून ज्ञान व अनुभूती घेत असणार. पांचरात्र दर्शनाचे नेमके हेच म्हणणे आहे. जीवात्मा व परमात्मा या दोहोमध्ये फरक एवढाच की जीवात्म्याच्या अवस्थांना पारिभाषिक शब्दात जागृति, स्वप्न, सुषुप्ति, व तुर्यावस्था म्हणायचे, आणि परमात्म्याच्या अवस्थांना वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध असे म्हणायचे, मात्र गणना करावयाची ती तुर्यावस्थेकडून जागृतीकडे.

जीवात्मा ज्याप्रमाणे वर दर्शविलेल्या क्रमानेच अवस्थांतरात जातो असे नाही तर यदृच्छेने कोणत्याही अवस्थेतून कोणत्याही दुसऱ्या अवस्थेत जाऊ शकतो व परत येऊ शकतो. तसेच परमात्मा देखील कोणत्याही अवस्थांतून ये जा करू शकतो. सर्कशीतील झोपाळ्यावरील खेळाडूंप्रमाणे त्यांचा सनातन खेळ चालत आला आहे.

सामान्य जणांच्या दृष्टीने परमात्मा जागा असणे म्हणजे आपली सर्वांची जीवितावस्था म्हणजे जागृतावस्था होय, त्याची अनिरुधावस्था म्हणजे आपल्या परिचयाची विश्वरुपावस्था आहे . परमेश्वराच्या अंतिम स्वरूपाचे म्हणजे वासुदेवाचे आकलन होण्यासाठी प्रथम अनिरुद्ध स्वरूप जाणून घ्यायला हवे व त्यासाठी त्याला स्वतःच्या अनुभूतींची व्यापकता वाढवून वरची वरची पातळी गाठायचा प्रयत्न करायला हवा. सर्कशीत ज्याप्रमाणे खालच्या पातळीवरील खेळाडू वरच्या पातळीवरील झोपाळ्याच्या झोक्यावर एकाग्र चित्त करून आपला झोका त्याच्या

जवळ नेण्याचा कौशल्याने प्रयत्न करतो व दोन झोपाळ्यांच्या सान्निध्याचा क्षण पकडून त्या क्षणी स्वतःचा झोपाळा मागे लोटून वरच्या पातळी वरील झोपाळ्या वर झेप घेतो त्याप्रमाणे परमार्थाचा साधक स्वतःच्या अवस्थांतराचे संतुलन साधत साधत तुर्यावस्थेच्या एखाद्या उत्कट क्षणी देहभावाचा झोपाळा मागे लोटून परमात्म्याच्या अनिरुद्ध स्वरूपाच्या जवळात जवळ आलेल्या झोक्यावर झेप घेतो. त्यानंतर मात्र वरच्या पातळीवरील म्हणजे परमात्मा पातळीवरील चतुर्विध अनुभूतीच्या वासुदेव-संकर्षण-प्रद्युम्न- अनिरुद्ध रुपी झोक्यांचा मनमुराद आनंद लुटता येतो, पांचरात्र दर्शनाने हीच मोक्ष संकल्पना मांडलेली आहे.

पण वर वर्णन केलेले झोपाळ्याचे संधान सहजासहजी साधण्यासारखे नाही; त्याला कर्मसु कौशलम म्हणजे प्रयत्नांचे कौशल्य सम्पादन करावे लागते आणि त्यासाठीच पंचरात्राने अर्चा स्वरूप सांगितलेले आहे. अर्चा म्हणजे मूर्ती तिच्यावर लक्ष एकाग्र करावयाचे. तिची षोडशोपचारे पूजा करता करता मानस पूजा देखील करावयाची व हळूहळू अनुभूतीची व्याप्ती व उदात्तता वाढवावयाची. ऐहिक सुखांकडे पाठ न फिरवता 'यद् वै भूमा तत् सुखम् ।' म्हणजे जे जे मोठे ते ते सुखावह या वचनाचा अनुभव घेत घेत व्यक्तिगत संकुचित उपभोग टाळून कुटुंबासमवेत, समाजासमवेत, समष्टि स्वरूपाने उपभोग घ्यायचा व त्यातून आत्मसुखाच्या कक्षा विस्तारत विस्तारत अनिरुद्धाकडे जाण्याचा मार्ग सुकर करावयाचा ही पांचरात्राची शिकवण आहे. परमार्थाचे रसिक दर्शन म्हणजे नेमके हेच होय.


**प्रा. प्रभाकर आपटे**

भ्रमणध्वनी : ७०२१७७६५१५

**सुधा साठ्ये**

भ्रमणध्वनी : ८८५०८५२१०९


●●●

(पृष्ठ क्र.८ वरून...'**गायत्री महाविज्ञान**')

गायत्री तंत्र, २४ गायत्री, गायत्री पुरश्चरण, गायत्री कवच, गायत्री स्तोत्र, गायत्रीचे न्यास, गायत्रीच्या मुद्रा, गायत्री लहरी, श्री गायत्री चालिसा, गायत्री सहस्रनाम, गायत्री वंदना, गायत्रीची आरती.

**गायत्रीचे स्वरुप :**

पंचमुखी गायत्री - पंचमुखी गायत्री म्हणजे मानवी शरीरातील अन्नमय कोश, प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश आणि आनंदमय कोश अशा पंचकोशांची शुद्धी, षट्चक्रांना प्रभावित करणे की जेणे करून माणसांची प्रगती मोक्षपदापर्यंत जाऊ शकेल. आणखीही बरेच काही आहे. म्हणून अतिसंक्षिप्त स्वरुपात हे टिपण केले आहे.


**- ॲड. रा. ना. कलभंडे**

गायत्री उपासक आणि अभ्यासक

११/अे-१, गजलक्ष्मी सोसायटी,

सहकार नगर नं. १, अरण्येश्वर रस्ता,

पुणे - ४११००९

फोन नं. : ०२०-२४२२४९३४

भ्रमणध्वनी : ९८५०९५८०९४

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

'सावधान' हे शब्द ऐकताच भर लग्नमंडपातून ते पळून गेले, असे म्हटले जाते. त्यानंतर तपश्चर्येसाठी ते नासिकला गेले आणि नासिकजवळील टाकळी ह्या गावी असलेली एक गुहा त्यांनी त्यासाठी निवडली. राममंत्राचा तेरा कोटी जप, वेदशास्त्रे, वेदान्त, काव्ये, पुराणे ह्यांचा अभ्यास गायत्री-पुरश्चरणे संगीतसाधना त्यांनी येथेच केली. त्यानंतर ते भारतभ्रमणास निघाले (१६३२). काशी, प्रयाग, गया, अयोध्या, श्रीनगर हिमालयातील बद्रिनारायण आणि केदारनाथ अशी अनेक ठिकाणे त्यांनी पाहिली. अयोध्येत त्यांचे वास्तव्य सर्वाधिक म्हणजे अकरा महिने होते. पंजाबात जाऊन तेथील शीख धर्मगुरूंना ते भेटले. मानसरोवराची प्रदक्षिणा केली. पुरीच्या जगन्नाथाचे दर्शन घेतले. दक्षिणेतीलही अनेक तीर्थांना त्यांनी भेटी दिल्या. महाराष्ट्रातही ते हिंडले. ह्या प्रवासात समर्थांनी अनेक साधुमहात्म्यांच्या भेटी घेतल्या. राम, हनुमान ह्यांची मंदिरे उभी केली. मठ स्थापन केले. समर्थांच्या आयुष्यातील ह्या यात्रापर्वात त्यांना भारताच्या लोकस्थितीचे दर्शन घडले. ते झाल्यानंतर समाजातील देवधर्माचे अराजक मोडावे, खऱ्या परमार्थाची स्थापना करावी आणि ऐहिक पुरूषार्थ साधणारी समाजव्यवस्था घडवावी, ही त्यांची साध्ये ठरली. ती सिद्ध करण्यासाठी ते कृष्णातीरी आले (१६४४). हे त्यांच्या आयुष्यातले अखेरचे पर्व. ह्या पर्वात ते राजकारण म्हणजेच धर्मसंस्थापनेचे कार्य अखेरपर्यंत करीत राहिले. समर्थांना अभिप्रेत असलेला राजा हा परमार्थसंस्थापक आणि सज्जनांचा रक्षक असा होता. अशा राजाचे राज्य हे त्यांच्या दृष्टीने रामराज्य होते. अशा रामराज्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी निर्माण करणे, म्हणजेच समर्थ करू पाहत असलेली धर्म-संस्थापना होती. समर्थांनी वापरलेल्या 'राजकारण' ह्या शब्दाचा अर्थ ह्या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे.

राजकारण धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भूत करणारे रामदास हे एकमेव महाराष्ट्रीय संत होत. शिवाजी महाराजांच्या राजकीय उलाढालींत रामदासांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता, हे जरी खरे मानले, तरी शिवाजी महाराजांनी हाती घेतलेल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला अनुकूल अशी मनोवृत्ती रामदासांनी लोकांत निर्माण केली, हे दिसून येते.

इस्लामी राजवटीत, भयापोटी लोकांनी डोहांत वा नद्यांत बुडविलेल्या अनेक देवतामूर्ती बाहेर काढून रामदासांनी त्यांची पुन्हा प्रतिष्ठापना केली. धर्मप्रचारासाठी देवळे बांधली. देवांचे सार्वजनिक उत्सव सुरू केले. सामाजिक जीवनाची नैतिक परिशुद्धी करणे हे रामदासांच्या राजकारणाचे मर्म होय.

परमार्थाचा अधिकार पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही आहे, असे रामदास मानीत. अक्काबाई आणि वेणूबाई ह्या त्यांच्या अनुयायी स्त्रिया प्रसिद्ध आहेत त्यांच्याखेरीज अन्य अनेक स्त्रियांनी रामदासांचे अनुयायीत्व स्वीकारले होते. त्यांत काही मुसलमान फकीरही होते. उच्च पातळीवरील धर्मविचारांत हिंदू, मुसलमान असा भेद त्यांनी केला नाही.

समर्थांच्या पट्टशिष्याचे नाव कल्याण (मूळ नाव अंबाजी). तो त्यांचा मुख्य लेखनिक होता. दिनकर स्वामी, गिरिधर इ. त्यांचे अन्य शिष्यही प्रसिद्ध आहेत. समर्थांनी चाफळ येथे श्रीरामाची स्थापना केली. ह्या देवस्थानास हिंदू सरदारांची, तसेच विजापूरच्या इस्लामी राज्याचीही इनामे मिळाली. शिवाजी महाराजांनीही वर्षाला दोनशे होन इनाम दिले. अनेक गावेही इनाम म्हणून दिली.

शिवाजी महाराजांनी समर्थांचा उपदेश घेतला होता. तथापि महाराजांच्या स्वराज्य संस्थापनेच्या कामात समर्थांचा प्रत्यक्ष संबंध होता, असे दाखविणारा आधार मिळत नाही. शिवराय-समर्थ भेट ही प्रथम स्वराज्य स्थापनेच्या अवघी दोनच वर्षे आधी (१६७२) झाली, असे काहींचे म्हणणे आहे. पण ज्या पत्रावरून ही पहिली भेट असे म्हणतात, ती पहिली भेट म्हणजे (राजे यांची पहिलीच भेट आहे. वाडीचे लोकास खटपटेस आणावे इ. मजकूर ह्या पत्रात आहे) त्या गावाची पहिली भेट असाही अर्थ निघू शकतो. शिवाजी महाराजांनी चाफळला दिलेल्या इनामाचे साल लक्षात घेतले, तर हे दोन्ही थोर पुरूष स्वराज्य स्थापनेपूर्वी अनेक वर्षे परस्परांना ओळखत होते, हे निश्चित आहे. शिवाय विचारवंत गुरू आणि पराक्रमी राज्यकर्ता ह्यांचा संबंध दृढ होतो. तो वैचारिक देवघेवीने. शिवाजी महाराजांनी अनेक साधुसंतांचे उपदेश घेतले, असे म्हटले जात असले, तरी रामदास आणि शिवाजी महाराज ह्यांचे गुरूशिष्यनाते वेगळे म्हणायला हवे. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर (१६८०) दोन वर्षांनी समर्थांचे सज्जनगडावर निधन झाले.

समर्थांच्या ग्रंथकर्तृत्वात दासबोध आणि रामायण (दोन कांडे) ह्यांचा प्रथम उल्लेख केला पाहिजे. दासबोध हा सर्मथांचा आणि रामदासी संप्रदायाचाही प्रमुख ग्रंथ. ७,७५१ ओव्यांच्या आणि दोनशे समासांच्या आजच्या दासबोधापूर्वी समर्थांनी एकवीस समासांचा एक दासबोधही रचलेला होता. मानवी सद्गुणांची वाढ व्हावी, लोक कर्तृत्वसंपन्न आणि परमार्थप्रवण व्हावेत, ही तळमळ दासबोधात दिसते.

रामदासी रामायणाची 'सुंदर' आणि 'युद्ध' अशी दोनच कांडे आहेत. समग्र रामायण रामदासांनी लिहिले नाही. सुंदरकांडाची श्लोकसंख्या १०१ असून युद्धकांडातील एकूण श्लोक १,३६२ इतके आहेत. 'निमित्य मात्र ते सीता विबुधपक्षपुरता' असे रामायणाचे सार रामदासांनी सांगितले आहे.

स्फुट कविता, प्रासंगिक कविता, आत्मारामसारखी वेदान्त प्रकरणे, अभंग, श्लोक, भूपाळ्या इ. अन्य बरीच रचना समर्थांची आहे. करुणाष्टक, मनाचे श्लोक, 'सुखकर्ता दुःखकर्ता वार्ता विघ्नाची.' ही महाराष्ट्रात घरोघरी म्हटली जाणारी श्रीगणेशाची आरती ह्या रचना तर विख्यात आहेत. रामदासांनी 'समर्थ' होण्यापूर्वी तपश्चर्या केली, बहुश्रुतपणा मिळविला, कवित्व प्राप्त करून घेतले. ह्या साधनेत निराशेचे क्षणही अनेकदा आले. अशा प्रासंगिक निराशेचे व उद्वेगाचे प्रतिबिंब त्यांच्या करुणाष्टकात पडलेले

आढळते. मनाच्या श्लोकांचा उर्दू अनुवाद शहा तुराव चिश्ती ह्या इस्लाम धर्मीयाने सु. अडीचशे वर्षांपूर्वी केला आहे. रामदासांनी संगीताभ्यास केला होता. केदार, बागेश्री, आसावरी, काफी अशा विविध रागांमध्ये त्यांनी बांधलेली पदे, त्यांच्या काही पदांतून आढळणारे तबल्याचे किंवा नृत्याचे बोल ह्यांतून हे लक्षात येते.

रामदासांच्या लेखनातून विखुरलेले साहित्यविषयक विचार शोधून रामदासांचे साहित्यशास्त्र (१९७३) ह्या नावाचा ग्रंथ भा. श्री. परांजपे ह्यांनी लिहिला आहे.

इंग्रजी अंमलापूर्वीच्या काळात रामदासांची बरीच चरित्रे लिहिली गेली, पण ती पौराणिक पद्धतीची आहेत. समर्थशिष्य गिरिधरस्वामी, हनुमंतस्वामी, महिपतिबुवा, दिनकरस्वामी, मेरुस्वामी, उद्धवसुत आदींनी लिहिलेल्या चरित्रांचा उल्लेख करता येईल.

समर्थ हे केवळ अध्यात्मिक सत्पुरुष नसून ते लोकशिक्षक, लोकनेता, नीतिशिक्षक, गुरु, राष्ट्रचिंतक, सुसंवादक, संघटक, व्यवस्थापक आणि समुपदेशक अशा सर्व भूमिकांमधून काम करत होते. मानवी सद्गुणांचे परिवर्धन घडून लोक परमार्थप्रवण आणि कर्तृत्वसंपन्न व्हावे ही तळमळ दासबोध या ग्रंथातून स्पष्टपणे प्रत्ययास येते.

महाराष्ट्रात वारकरी परंपरा संत ज्ञानेश्वरांच्या पासून कार्यरत असताना समर्थांनी रामदासी परंपरा निर्माण करण्यामागचा हेतू आपण समजून घेतला पाहिजे. वारकरी परंपरा आणि रामदासी परंपरा दोन्ही एकमेकांना पूरक आणि अत्यंत योग्यरीत्या समाजाचे समुपदेशन करणाऱ्या आणि महाराष्ट्राला ललामभूत ठरणाऱ्या उज्ज्वल परंपरा आहेत. या अध्यात्मिक घुसळणीतून छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्याची स्थापना करता आली हे विसरता कामा नये. संतांचा विचार हा छत्रपतींच्या कामांना नक्कीच पोषक होता.

समर्थांनी केलेल्या आजन्म प्रवास व चिंतनाचा लेखाजोखा त्यांच्या दासबोध या ग्रंथामध्ये सविस्तरपणे मांडला आहे. या ग्रंथाची ओवीसंख्या ७,७५१. ह्या ग्रंथांत एकूण वीस दशक असून प्रत्येक दशकात दहा समास आहेत. दोनशे समासांचा हा समर्थरचित ग्रंथ आज  दासबोध ह्या नावाने ओळखला जात असला, तरी समर्थ आपल्या प्रत्येक उपदेशाला 'दासबोध' असेच म्हणत असत, असे दाखवून देणारी प्रमाणे आहेत. आजच्या दोनशे समासी दासबोधापूर्वी एकवीस समासांचा एक दासबोध त्यांनी रचिलेला होता आणि समर्थ सांप्रदायिकांच्या हस्तलिखितांतून 'जुना दासबोध' असे त्याचे वर्णनही आढळते. दोनशे समासी दासबोधातील सातव्या दशकालाही एके कळी दासबोध असे संबोधिले जाई. मराठी विश्वकोशातील नोंदीनुसार रामदासी साहित्याचे एक अभ्यासक श. श्री. देव ह्यांनी दासबोधाचे एकूण तीन अवतार मानिले आहेत. एकवीस समासी दासबोध हा पहिला अवतार त्यानंतरचा दासबोध पहिल्या सहा दशकांपर्यंतचा, म्हणजे हा दुसरा अवतार सातवा दशक हा तिसरा

अवतार. आजच्या वीस दशकी दासबोधातील आठवा दशक हा 'ज्ञानदशक' म्हणून ओळखला जातो. त्याचा उल्लेख चौथ्या आणि पाचव्या दशकाच्या दहाव्या समासांत आलेला आहे. उपर्युक्त सातव्या दशकाला ह्या आठव्या ज्ञानदशकाची जोड देऊन देवांनी 'दशक ८ पर्यंतच काय तो दासबोध ग्रंथ अशी एकवार श्री समर्थांची कल्पना असावी' आणि 'पुढे शिष्यांनी वारंवार प्रश्न विचारून त्यांची उत्तरे देण्यात बरेच फुटकळ समास लिहिले गेल्यामुळे त्यांच्यात संगती जुळवून ते सर्व समास दासबोधांत सामील करण्यात आले असावे' असा आपला अंदाज व्यक्तविला आहे. तथापि ह्या अंदाजाला भक्कम आधार नाहीत, असे न. र. फाटकांसारख्या अभ्यासकांनी दाखवून दिलेले आहे. समर्थांनी लिहिलेले मनाचे श्लोक आजदेखील मानसोपचार तज्ज्ञ मानसशास्त्रज्ञ व शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना उपयुक्त आहेत. ''मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण'' असा विचार संत तुकारामांनी देखील त्या काळात दिला होता मात्र समर्थांनी भुजंगप्रयात वृत्तामध्ये लिहिलेले २०५ मनाचे श्लोक या अर्थाने खूप महत्त्वाचे आहेत.

समर्थांनी असं म्हटलं की:

मुख्य ते हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण।
तिसरे ते सावधपण । सर्वविषई ।।

वरील ओवीचा सरळ अर्थ असा आहे की समर्थ शिष्यांनी तसेच समर्थांच्या अनुयायांनी किंवा महंतांनी कुठल्या प्रकारचे काम केले पाहिजे; हे सांगताना समर्थ म्हणतात: की पहिलं हरी कथेचे निरुपण केले पाहिजे, दुसरं राजकारण पाहिले पाहिजे आणि सर्व विषयी सावधपण हा तिसरा गुण समर्थ शिष्यांच्या अंगी असला पाहिजे.

'राजकारण' हा शब्द दासबोधात अनेकदा आलेला आहे. समर्थांनी हा शब्द निर्माण केला. अकराव्या दशकातील पाचवा आणि एकोणिसाव्या दशकातील नववा, असे दोन समास राजकारणाचे म्हणूनच आलेले आहेत. समर्थांनी हा शब्द कोणत्या अर्थाने योजिला, हा प्रश्न वादग्रस्त आहे. 'पॉलिटिक्स' किंवा राजनीती ह्या अर्थाने तो आला आहे, असे मानणारा एक पक्ष आहे तथापि युक्ती, शहाणपण, चातुर्य, तीक्ष्ण बुद्धी असा त्याचा अर्थ समर्थांना अभिप्रेत आहे, असे मत न. र. फाटक ह्यांनी मांडले आहे. समर्थांनी स्वीकारलेल्या ध्येयवादाला त्यांनी 'देवकारण' असे म्हटले आहे. सकळांची अंतरे जाणणाऱ्या निःस्पृह, अलौकिक पुरुषांनी करावयाची धर्मस्थापना हेच समर्थांचे राजकारण होते आत्म्याचे अनंत राजकारण म्हणजे विश्वप्रपंच ते जसे गुप्तपणे चालते, तसेच मानवी प्रपंचाचे राजकारण महंताने चालविले पाहिजे. असा समर्थांच्या शिकवणीचा अन्वयार्थ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांनी लावलेला आहे.

सामान्यांना समजतील इतक्या सुबोध पण सडेतोड भाषेत समर्थांनी आपले विचार मांडण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. त्यांतील अनेक उद्गारांना आज सुभाषितांचे स्वरूप आलेले आहे. परमार्थाखेरीज कवित्व,

लेखन आदी स्फुट विषयही दासबोधात आलेले आहेत. कवित्व हे परोपकारासाठी असावे, त्याने भगवद्भक्ती साधावी, अशी समर्थांची कवित्वविषयक भूमिका असून ती परमार्थाशीच निगडित आहे. धीट, धीटपाठ आणि प्रासादिक असे कवितेचे तीन प्रकार त्यांनी सांगितले आहेत. मनाला येईल ते बळेच धीटपणे लिहिणे, हा 'धीट' कवित्वाचा प्रकार. जे दृष्टीस पडले तेच भक्तीवाचून वर्णिले तर त्याला 'धीटपाठ' म्हणावयाचे. हे दोन्ही प्रकार हीन होत. कवित्व प्रासादिक असावे आणि देवकृपेने मुखातून निघणारे बोल प्रासादिक ठरतात, असे ते म्हणतात. कवींना त्यांनी 'शब्दसृष्टीचे ईश्वर' म्हणून संबोधिले आहे.

या ग्रंथाची महाराष्ट्रात अनेकांकडे श्रद्धापूर्वक पारायणे केली जातात. १९०५ साली धुळे येथील रामदासी साहित्याचे अभ्यासक शंकर श्रीकृष्ण देव ह्यांनी कल्याणस्वामीने स्वहस्ते लिहिलेली दासबोधाची प्रत प्रसिद्ध केली आणि तिला स्वतःची एक विस्तृत प्रस्तावना जोडून ह्या ग्रंथाच्या अभ्यासाची एक दिशा दाखविली.

समर्थांनी अनेक स्फुट अभंग व स्फुटरच नाही लिहिल्या आहेत. त्यांनी लिहिलेली पावन भिक्षा फारच सुंदर आहे

पावन भिक्षा :

(Qualities of a balanced human being)
कोमल वाचा दे रे राम, विमल करणी दे रे राम ।
प्रसंग ओळखी दे रे राम, धूर्त कळा मज दे रे राम ।।
हीत कारक दे रे राम, जन सुख कारक दे रे राम ।
अंतर पारखी दे रे राम, बहुजन मैत्री दे रे राम।।

विद्या वैभव दे रे राम, ऊदासिनता दे रे राम ।
मागो नेणे दे रे राम, मज न कळे ते दे रे राम।।

तुझी आवडी दे रे राम, दास म्हणे मज दे रे राम । संगीत गायन दे रे राम, अलाप गोडी दे रे राम।।

धात माता दे रे राम, अनेक घाटी दे रे राम। रसाळ मुद्रा दे रे राम, जाड कथा मज दे रे राम।। दस्तक टाळी मज दे रे राम, नृत्य कला मज दे रे राम। प्रबंध सरली दे रे राम, शब्द मनोहर दे रे राम ।।

सावध पण मज दे रे राम, बहुत पाठांतर दे रे राम। दास म्हणे रे सद्गुण धाम, उत्तम गुण मज दे रे राम ।। पावन भिक्षा दे रे राम, दिन दयाळा दे रे राम।

अभेद भक्ती दे रे राम, आत्म निवेदन दे रे राम ।। तद्रूपता मज दे रे राम, अर्थारोहण दे रे राम ।

सज्जन संगती दे रे राम, अलीप्तपण मज दे रे राम।। ब्रह्म अनुभव दे रे राम, अनन्य सेवा दे रे राम मजवीण तू मज दे रे राम, दास म्हणे मज दे रे राम।।

वरील पावन भिक्षेतील आलेल्या वेगवेगळ्या विषयांवर लिहिणे म्हणजे एका स्वतंत्र लेखाचा विषय होईल. मात्र सध्याच्या

पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट च्या जगामध्ये उत्तम व्यक्तिमत्व घडविण्यासाठी कुठल्या महत्त्वाच्या गोष्टी व्यक्तीला आवश्यक वाटतात त्या एका पद्यामध्ये त्यांनी पावन भिक्षेच्या स्वरुपात आपणासमोर मांडल्या आहेत.

समर्थ रामदासांनी छत्रपती संभाजी राजांना लिहिलेले पत्र देखील उत्कृष्ट व्यवस्थापनाचा सुंदर नमुना आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पायावर पाय ठेवून हिंदवी स्वराज्याची स्थापना व संवर्धन करण्यासाठी समर्थ रामदास छत्रपती संभाजी राजांना अत्यंत व्यवस्थितरीत्या खालील पत्रामध्ये समजून सांगतात. यामधील व्यवस्थापनाची तत्त्वे समजून घेणे हा एका स्वतंत्र लेखाचा विषय होईल.

समय प्रसंग ओळखावा । राग निपटून काढावा।
आला तरी कळों न द्यावा । जनांमध्यें ।।

राज्यामध्ये सकळ लोक । सलगी देऊन करावे सेवक। लोकांचे मनामध्यें धाक । उपजोंचि नये ।।

आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मिळवावें।
महाराष्ट्रराज्य करावें । जिकडे तिकडे ।।

लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तरवार करावी।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ।।

शिवराजास आठवावें । जीवित्व तृणवत् मानावें। इहपरलोकी रहावें। कीतीर्रूपे ।।

शिवरायांचे आठवावे रूप । शिवरायांचा आठवावा प्रताप ।। शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ।।

शिवरायांचे कैसें चालणें । शिवरायांचें कैसें बोलणे।।
शिवरायांचे सलगी देणें । कैसे असें ।।

सकळ सुखांचा त्याग । करून साधिजे तो योग ।। राज्यसाधनाची लगबग । कैसी असे।।

त्याहूनि करावे विशेष । तरीच म्हणावे पुरुष।।
या उपरी विशेष । काय लिहावें ।।

सध्याच्या ऑनलाईन शिक्षणाच्या जमान्यात शिक्षक व विद्यार्थी यांचे नाते बदलत जात असून समर्थांनी सांगितलेली गुरुची लक्षणे समजून घेण्यासारखे आहे.

प्रत्येक जणाचा प्रत्येक जातीचा वेगळा गुरु असतो त्या सर्व गुरूंचा उदंड विचार सांगणे कठीण असून जो मोक्ष हातामध्ये तत्त्वतः आपल्या आणून देतो त्याला मोक्ष सद्गुरु म्हणावे असे समर्थ म्हणतात.

असो ऐसे उदंड गुरु। नाना मतांचा विचारु।
परी जो मोक्षाचा सद्‌गुरु। तो वेगळाची असे।

तसेच शिष्याला कुठलीही साधनशुचिता न पाळता हातामध्ये रेडीमेड म्हणून देणारे गुरु मिळाले तरी सुद्धा त्यांचा त्याग करावा अशी सक्त ताकीद समर्थ रामदास देतात संशोधन कार्यामध्ये संशोधकाने कसे वागले पाहिजे आणि कामाची एक विशिष्ट साधना करवून घेणारे खऱ्या अर्थाने त्या पदाला प्राप्त होतात असे समर्थांना सुचवायचे आहे. समर्थ म्हणतातः

शिष्यास न लाविती साधन। न करविती इंद्रिय दमन। ऐसे गुरू अडक्याचे तीन मिळाले। तरी त्यजावे।

विद्यार्थ्याला सूचना देताना समर्थ म्हणतात की दिवसांमध्ये अखंडित वाचत राहिलं पाहिजे आणि काहीतरी लिहिले देखील पाहिजे. खरं बोला, शास्त्रानुसार वागा जेणेकरून तुम्हाला लोक सन्मान देतील असा विचार समर्थ देतात.

दिसामाजी काहीतरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडीत वाचीत जावे ।
बरे सत्य बोला यथातथ्य चाला।
बहु मानिती लोक येणे तुम्हाला।'

समर्थांनी आपले जीवन राष्ट्रकार्यासाठी समर्पित केलं असून देवाच्या सख्यत्वासाठी त्यांनी सर्व गोष्टींचा त्याग करून समाजासाठी आपलं आयुष्य अर्पण केलं. समर्थांचा विचार अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यातील समायोजितता समजून घेणे क्रमप्राप्त झाले आहे.

देवाच्या सख्यत्वासाठी। पडाव्या जिवलगासी तुटी। सर्व अर्पाचे सेवती। प्राण तोही वेचावा।।

**संदर्भ :**


१. फाटक, न. र. रामदास : वाङ्मय आणि कार्य, मुंबई, १९५३.

२. फाटक, न. र. श्रीसमर्थ चरित्र, पुणे, १९५१.

३. कुलकर्णी, अ. र. मराठी विश्वकोश


•••


**वृत्तपत्र नोंदणी नियमाप्रमाणे (केंद्रीय) 'सद्धर्म' त्रैमासिकाच्या मालकीविषयी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन.**

1. **प्रकाशन स्थळ : ए/५०३, सन्निधीपार्क सोसायटी, हरीओम नगर, मुलुंड (पू.)-४०००८१**
2. **प्रसिद्धीचा नियत काल : दर चौथ्या महिन्याच्या पहिल्या तारखेस.**
3. **मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : अनंत विनायक धोरे, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे.**
4. **प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : वरीलप्रमाणे.**
5. **संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय पत्ता वरील प्रमाणे.**
6. **एकूण भांडवलाच्या १ टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदार व्यक्तीसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवे : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट. पत्ता वरीलप्रमाणे.**
   **मी अनंत विनायक धोरे, जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे.**

**सही - अनंत विनायक धोरे**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, ए/५०३, सन्निधीपार्क सोसायटी, हरीओम नगर, मुलुंड (पू.)-४०००८१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१